**सुविचार**

हम सभी को समस्याओं का सामना करना पडता है परन्तु महत्वपूर्ण बात यह है कि हम सभी इनका सामना किस ढंग से करते हैं ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/गुरुवार दि. २३ मे २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१८६ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

# शेतकऱ्यांची पुन्हा दिल्लीकडे कूच



नवी दिल्ली : पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, पश्रिचम उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि राजस्थानमधील हजारो शेतकरी शंभू सीमेवर जमू लागले असून शंभू सीमेवरील शेतकरी आंदोलनाचा उद्या १०० वा दिवस आहे. हे पाहता हजारो शेतकरी मोर्चा काढत आहेत. बुधवारी सकाळपासूनच शेतकरी आंदोलनस्थळी येऊ लागले आहेत. ग्राऊंड झिरोवर शेतक-यांनी मोठा मंडप उभारला असला तरी जागेजवळ अनेक छोटे तंबूही उभारण्यात आले आहेत.

आंदोलनस्थळी उभारलेल्या मंडपांमध्ये शेतकरी मोठ्या संख्येने बसले आहेत. १३ फेब्रुवारी रोजी सुरक्षा दलांनी दिल्लीकडे निघालेला त्यांचा मोर्चा रोखल्यानंतरही आंदोलक शेतकरी शंभू आणि खनौरी सीमेवर आहेत. ताडपत्री, पंखे आणि रेफ्रिजरेटर असलेल्या ट्रॅक्टर-ट्रॉलीचे घरामध्ये रूपांतर करण्यात आले आहे. मात्र, तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या आसपास असून हवामान खात्याने उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. सुमारे ४०,००० शेतकरी या ठिकाणी जमतील अशी शक्यता शेतकरी नेत्यांची आहे. पंजाब पोलिसांनीही वाहतूक सुरळीत चालण्यासाठी जागोजागी चौक्या उभारल्या आहेत.

काय आहेत मागण्या?

आज रणनीतीवर चर्चा करताना, हरियाणाचे अध्यक्ष अमरजीत सिंह मोहरी आणि जाट नेते अशोक बुलारा म्हणाले की आम्हाला एमएसपीची कायदेशीर हमी हवी आहे आणि डॉ स्वामीनाथन यांच्या सी२ प्लस ५० टक्के सूत्रानुसार त्याचा निर्धार हवा आहे. याशिवाय शेतकरी आणि शेतमजुरांची सरसकट कर्जमाफी, १० हजार रुपये प्रति महिना सामाजिक सुरक्षा, लखीमपूर खेरीतील शेतक-यांना न्याय आणि सरकारी खर्चाने पीक विमा योजना हवी आहे.

# महाराष्ट्रासह ३ राज्यांत भाजपला फटका

नवी दिल्ली : भाजप नेत्यांच्या अहवाल आणि मूल्यांकनानुसार पूर्व भारतात पक्षाची कामगिरी अपेक्षेपेक्षा चांगली राहिली आहे. पश्चिम बंगाल, ओडिशा, आसाम आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये भाजपला फायदा होईल. तर महाराष्ट्र, कर्नाटक, हरयाणात पक्षाला फटका बसेल. या राज्यांत होणा-या नुकसानाची भरपाई पश्चिम बंगाल, ओडिशा, उत्तर प्रदेश, तेलंगणामधून होईल अशी चर्चा आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातले मतदान झाले आहे. राज्यातील सर्वच्या सर्व ४८ जागांवर मतदान झाले आहे. या दोन टप्प्यांमध्ये एकूण ११४ जागा आहेत. पाच टप्प्यातील मतदानानंतर भारतीय जनता पक्षाकडून विजयाचा विश्वास व्यक्त केला जात आहे. त्यामुळे भाजपच्या राष्ट्रीय मुख्यालयात आनंदाचे, उत्साहाचे वातावरण आहे. मोदी मॅजिकमुळे भाजप पुन्हा सत्तेत



येणार असल्याचा विश्वास नेते, पदाधिका-यांना आहे. मतदानाच्या पाचव्या टप्प्यानंतर भाजपने सर्व राज्यांचे अहवाल, सर्वेक्षण संस्थांचे अहवाल आणि अंतर्गत मूल्यांकनाच्या आधारे मोठ्या विजयाचा दावा केला आहे. भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी सर्व राष्ट्रीय सरचिटणीसांसह ५ टप्प्यांतील मतदानाचा आढावा घेतला. त्याआधारेच भाजप मोठा विजय होईल असा दावा केला जात आहे. मतदान पार पडलेल्या राज्यांमधील नेते, उमेदवार दिल्ली गाठू लागले आहेत.

दोन टप्प्यांत ११४ जागा मोदींच्या करिश्म्यापुढे अन्य समीकरण फोल ठरत असल्याचा भाजपचा दावा आहे. त्यामुळेच मोदी हॅट्रिक करणार असल्याचा दावा भाजप नेते करत आहेत. अमित शहादेखील पाचव्या टप्प्यानंतर एनडीएने ३०० जागांचा टप्पा पार केल्याचे सभांमधून सांगत आहेत. पुढच्या दोन टप्प्यांमध्ये ११४ जागा आहेत. त्यांच्या व्यवस्थापनासाठी भाजपने प्रत्येक मतदारसंघात एक ज्येष्ठ नेते, एक खासदार, राज्यातील ज्येष्ठ नेते आणि बाहेरुन १०० कार्यकर्ते पाठवले आहेत.

## हेमंत सोरेन यांना सर्वोच्च धक्का

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी जामीन अर्ज दाखल करणारे झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. सर्वोच्च न्यायालयाने सोरेन यांना अंतरिम जामीन देण्यास नकार दिला आहे. हेमंत सोरेन सध्या जमीन घोटाळ्याशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात तुरुंगात आहेत. निवडणुकीत पक्ष आणि उमेदवाराच्या प्रचारासाठी त्यांनी सर्वोच्च न्यायालयात अंतरिम जामिनासाठी याचिका दाखल केली होती. त्यावर आज माननीय न्यायालयाने सोरेन यांना अंतरिम जामीन देण्यास नकार दिला.

हेमंत सोरेनच्या अंतरिम जामीन याचिकेवर देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की, कनिष्ठ न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेतली आहे. एवढेच नाही तर या प्रकरणात नियमित जामीन अर्जही फेटाळण्यात आला आहे. अशा स्थितीत तुमच्या अटकेला आव्हान देणा-या याचिकेत ऐकण्यासारखे ठोस असे काहीच नाही. यासोबतच न्यायालयाने सोरेन यांचे वकील कपिल सिब्बल यांना सांगितले की, तुमच्या पक्षकाराच्या याचिकेत अनेक तथ्ये लपवण्यात आली आहेत. यामुळे तुमच्या याचिकेच्या गुणवत्तेचा विचार न करता अटकेविरोधातील याचिका फेटाळून लावू, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. यानंतर सिब्बल यांनी अंतरिम जामिनाचा अर्ज मागे घेतला.

## अखेर अल्पवयीन आरोपीचा जामीन रद्द

पुणे : पुणे अपघात प्रकरणी अल्पवयीन आरोपीचा जामीन रद्द करण्यात आला असून त्याची आता बालसुधारगृहात रवानगी करण्यात येणार आहे. दारू पिऊन नशेमध्ये भरधाव वेगाने गाडी चालवत या अल्पवयीन आरोपीने दोघांचा जीव घेतला होता. अटक झाल्यानंतर त्याला १५ तासांमध्येच जामीन मंजूर करण्यात आला होता. आता बाल न्याय मंडळाने त्याचा जामीन रद्द केला असून अल्पवयीन आरोपी हा सज्ञान आहे की नाही हे पोलिस ठरवतील असेही बाल न्याय मंडळाने म्हटले आहे.

बुधवारी सकाळी पुणे पोलिसांनी अल्पवयीन आरोपीला कोर्टात हजर केले. त्यावेळी युक्तीवाद करत असताना पोलिसांनी मुलगा दारु प्यायला होता हे न्यायालयाला पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी अल्पवयीन मुलाने कोझी किचन हॉटेलमध्ये भरलेले ४८ हजार रुपयांचे बीलही कोर्टासमोर सादर केले. तर तिकडे बचावपक्षाच्या वकिलांनी मुलगा अल्पवयीन असल्याचा युक्तीवाद केला. दोन्ही बाजूचे युक्तीवाद झाल्यानंतर न्यायलयाने आदेश दिला. हा मुलगा अल्पवयीन असल्याचे आरोपीच्या वतीने युक्तीवाद केला. तर या आरोपीने **(पान २ वर)**

# स्वातंत्र्याचा स्वैराचार होऊ देऊ नका

पुणे : पुण्यात एका अल्पवयीन मुलाने मद्यधुंद अवस्थेत कार चालवत दोघांना चिरडल्यामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. या घटनेतील आरोपी मुलगा वेदांत अग्रवाल हा १७ वर्षांचा असून पुण्यातील बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल यांचा मुलगा आहे. विशाल यांचे सरकारी यंत्रणेशी व अंडरवर्ल्डशी लागेबांधे आहेत, त्यामुळे मुलावर कठोर कारवाई झाली नाही आणि घटनेनंतर पाच तासांतच त्याला जामीन देण्यात आला, असा संताप व्यक्त करण्यात येत आहे. पुणे पोलिसांच्या कार्यक्षमतेवरही या प्रकरणी प्रश्र्न उपस्थित करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेत आतापर्यंत झालेल्या



संपूर्ण कारवाईची माहिती दिली तसेच पालकांना एक आवाहनही केले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ही घटना घडल्यानंतर पोलिसांनी कलम ३०४ चा अतिशय स्पष्ट उल्लेख करत रिमांडचं ॲप्लिकेशन ज्युएनाईल जस्टीसकडे केलं होतं. यात स्पष्टपणे लिहिलं होतं की हा जो मुलगा आहे हा १७ वर्षे ८ महिन्यांचा असल्यामुळे, निर्भयाकांडानंतर कायद्यात झालेल्या अमेंडमेंटनुसार १६ वर्षावरील जी मुलं असतील त्यांना हिनियस क्राईममध्ये अडल्ट म्हणून ट्रीट केलं जाऊ शकतं. हा खटला ३०४ (अ) नाही तर ३०४ च आहे, त्यामुळे आरोपीला प्रौढ समजून खटला चालवण्यास परवानगी द्यावी, अशा प्रकारे पोलिसांनी प्रेस केलं होतं.

दुर्दैवाने ज्युएनाईल जस्टिस्ट बोर्डने त्याबाबत वेगळी भूमिका घेतली. आरोपीला प्रौढ म्हणून ट्रीट करण्यासाठी जो अर्ज करण्यात आला होता तो केवळ सीन आणि फाईल्ड केल्याने पोलिसांसाठीही हा धक्का ठरला. या गुन्ह्याचे सर्व पुरावे पोलिसांनी दिल्यानंतरही बोर्डाने घेतलेली भूमिका आश्र्चर्यकारक आहे. याबाबत तात्काळ वरच्या कोर्टात ॲप्लिकेशन गेल्यानंतर कोर्टाने दखल घेतली. कोर्टाने सांगितलं याबाबत तुम्हाला पहिल्यांदा ज्युएनाईल जस्टिस्ट बोर्डाकडे **(पान २ वर)**

# संविधान धोक्यात आहे अशी वक्तव्यं करु नका

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीसाठी राज्यातील मतदानाचे सर्व टप्पे पार पडले असून देशभरात मतदानाचे दोन टप्पे बाकी आहेत. यासाठी राजकीय नेत्यांचा जोरदार प्रचार सुरु आहे. मात्र या प्रचारादरम्यान, एकमेकांवर टीका करत असतानाच दोन प्रमुख पक्ष म्हणजेच भाजप व काँग्रेस यांच्याकडून धार्मिक वक्तव्ये केली जात आहेत. टीकेची भाषा अत्यंत खालच्या पातळीला गेली आहे. याचं गांभीर्य लक्षात घेत भारतीय निवडणूक आयोगाने पुन्हा एकदा दोन्ही पक्षाच्या पक्षाध्यक्षांना धार्मिक वक्तव्ये टाळण्याचे आदेश जारी केले आहेत. तसेच दोन्ही पक्षाध्यक्षांनी आपापल्या पक्षाला याबाबत नोटीस जारी करण्याची सूचना दिली आहे.

निवडणूक प्रचाराचा घसरलेला दर्जा पाहता आयोगाने भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष जेपी नड्डा आणि काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना आपापल्या पक्षांच्या स्टार प्रचारकांना अयोग्य विधाने न करण्यासाठी, सावधगिरी बाळगण्यासाठी आणि शिष्टाचारात राहण्यासाठी औपचारिक नोटीस जारी करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, जात, समुदाय, भाषा आणि धर्माचे नाव घेऊन प्रचार करु नये, तसेच अग्निवीर योजना आणि भारतीय संरक्षण दलांचे/भारतीय सैन्याचे राजकारण न करण्याचा सल्ला काँग्रेसच्या स्टार प्रचारक आणि उमेदवारांना दिला आहे. निवडणुकीमुळे भारताच्या सामाजिक-सांस्कृतिक वातावरणावर परिणाम होऊ नये, असेही आयोगाने म्हटले आहे.

निवडणूक आयोगाची मल्लिकार्जुन खरगेंना सूचना

निवडणूक आयोगाने संविधानासंदर्भात मल्लिकार्जुन खरगेंना एक विशेष **(पान २ वर)**

## डॉ. संजयकुमार शिवपुजे यांचे हृदय आणि आरोग्याची काळजी विषयवर व्याख्यान

लातूर प्रतिनिधी- येथील कपीलधारेश्वर प्रतिष्ठान च्या वतीने महात्मा बसवेश्वर यांच्या ९१९ व्या जयंती निमित्ताने हार्ट टक व अवेळी होणारे मृत्यू या बद्दल घ्यावयाची काळजी हृदय संवाद विषयावर दि. २३ मे २०२४ गुरुवार रोजी भालचंद्र ब्लड बँक सभागृहात सांय. ५.०० वाजता हृदय रोग तज्ञ डॉ. संजयकुमार शिवपूजे यांचे व्याख्यान करण्यात आले असुन , इंजि . राजकुमार कत्ते हे अध्यक्स्थानी राहाणार आहेत.

महात्मा बसवेश्वर जयंतीचे औचित्य साधुन श्री कपीलधारेश्वर पुरस्कार - समाजभूषण श्री. डांगे राजेश्वर, शिक्षणरत्न श्री. कमलेश पाटणकर व सौ. शैलजा पाटणकर, प्राचार्या डॉ. शामलीला बावगे जेवळे, उद्योगरत्न इंजि. तेजस बिराजदार यांना सन्मानित करण्यात येणार आहे. सर्व नागरिकांनी या आरोग्यदायी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री. राजकुमार बिडवे, प्रा. डॉ. नयन राजमाने, प्रा. राजेश विभुते, वैजनाथ जामगे यांनी केले आहे.

# आरटीओ कार्यालयात चाचणीसाठी जाण्याची गरज नाही

नवी दिल्ली : वाहन चालविण्यासाठी आवश्यक असणारा परवाना काढण्यासाठी आरटीओत जाऊन ड्रायव्हिंग टेस्ट देणे आवश्यक होते. परंतु आता आरटीओत न जाता प्रशिक्षण देणा-या संस्थांमध्येच ही टेस्ट देता येणार आहे. त्यासाठी ठराविक संस्थांना मान्यता दिली जाणार आहे. रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालयाने जारी केलेले नवे नियम १ जूनपासून लागू होणार आहे. त्याशिवाय मंत्रालयाने अन्य काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहे.

दरम्यान प्रदूषण करणारे सुमारे ९ लाख जुने सरकारी वाहने सेवेतून बाद ठरविण्यात येणार आहे. तसेच वाहनचालक अल्पवयीन आढळल्यास



तब्बल २५ हजारांचा दंड ठोठावला जाईल. तसेच त्यास २५ व्या वर्षापर्यंत लायसन्स दिले जाणार नाही. तसेच वाहनमालकांची नोंदणी रद्द केली जाईल. त्याचबरोबर लायसन्स काढण्याची प्रक्रिया सुलभ केली जाणार आहे. वाहनाच्या प्रकारानुसार मोजकेच कागदपत्रे लागणार आहेत. कागदपत्रांसाठी https://parivaha-.gov.i- /.यासकेतस्थळावर अर्ज करता येणार आहे. कागदपत्रे सादर करण्यासाठी व ड्रायव्हिंग टेस्ट देण्यासाठी मात्र आरटीओ कार्यालयात येण्याची आवश्यकता नसल्याचे सांगण्यात आले.

नवे शुक्ल लागू होणार

लर्निंग लायसन्स : १५० रुपये, लर्निंग लायसन्स चाचणी शुल्क : ५० रुपये, ड्रायव्हिंग टेस्ट शुल्क : ३०० रुपये, ड्रायव्हिंग लायसन्स : २०० रुपये, लायसन्स नूतनीकरण : २०० रुपये, दुस-या वाहनाचे अतिरिक्त लायसन्स : ५०० **(पान २ वर)**

# डाळ महागली; तुटवडा की साठेबाजी?

नवी दिल्ली/ मुंबई : महागाई प्रत्येक गोष्टीत अस्मानाला जाऊन भिडत असून थांबण्याचे किंबहुना कमी होण्याचे नावही दिसून येत नाही. महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असून आता डाळींच्या दरानेदेखील उच्चांक गाठला आहे. बाजारपेठेत तूर डाळ व हरभरा डाळींचे दर महागले आहेत.

एकीकडे बाजारात डाळींचा तुटवडा नाही असे म्हटले जात आहे पण ङ्गसिस्टीमच्याफ दुर्लक्षामुळे भाववाढ होत असल्याचे म्हटले जात आहे. मागील हंगामात तूर डाळीच्या उत्पादनाला फटका बसला पण सध्या कारवाई थांबल्याने बडे साठेबाज हात धुऊन घेत असल्याचा आरोप व्यापारी करीत आहेत. नगर जिल्ह्यात नगर, पाथर्डी, कर्जत, जामखेड, पारनेर, नेवासा, शेवगाव आदी तालुक्यात कमी पावसामुळे यंदा उत्पादन कमी आहे. गुजरात राज्यातील व्यापा-यांनी तूर डाळ जास्त प्रमाणात खरेदी केल्याचे व्यापा-यांनी सांगितले. बाजारात तुटवडा नाही; पण साठेबाजीमुळे भाव वाढत असल्याचे व्यापा-यांचे मत आहे. व्यापा-यांनी सांगितले की, तुटवड्यामुळे ७ वर्षांपूर्वी तूर डाळीला किलोमागे २०० रुपये मोजावे लागले होते. आता तीच परिस्थिती आहे. २०१२ मध्येही तूर डाळ २०० रुपयांपर्यंत गेली होती.

देशात तुरीचे पीक केवळ खरिप हंगामात घेतले जाते. या पिकात ९.३२ टक्क्यांची तूट होतीच, मात्र अनियमित पावसामुळे पीक मोठ्या प्रमाणावर खराब होऊन प्रत्यक्ष उत्पादनात मोठ्या तुटीची चिन्हे आहेत. दुसरीकडे, कांदा किरकोळ **(पान २ वर)**

# मतमोजणी विषयक निर्देशांचे पालन करावे: जिल्हाधिकारी

**लातूर / प्रतिनिधी-** लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी लातूर मतदारसंघात सर्वांच्या सहकार्यामुळे मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. त्याचप्रमाणे ४ जून २०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी सर्व उमेदवार, राजकीय पक्ष प्रतिनिधी आदी सर्वांनीच भारत निवडणूक आयोगाने मतमोजणीविषयी दिलेल्या निर्देशांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. मतमोजणी प्रक्रिया आणि पूर्वतयारीबाबत माहिती देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित उमेदवार, उमेदवार प्रतिनिधी यांच्या बैठकीत त्या बोलत होत्या.




प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी संगीता टकले, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार पंकज मंदाडे यांच्यासह उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. उपस्थित सर्वांना मतमोजणीसाठी करण्यात आलेली तयारी आणि टपाली मतदान, सैनिकांचे मतदान आणि ईव्हीएमवरील मतमोजणीच्या प्रक्रियेबाबत माहिती देण्यात आली. तसेच सर्वांना मतमोजणी प्रतिनिधींसाठीच्या निदेश पुस्तकाचे वितरण करण्यात आले.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आतापर्यंतची प्रक्रिया शांततेत पार पडली आहे. निवडणूक प्रक्रियेतील सर्वात महत्वाचा मतमोजणीचा टप्पा ४ जून २०२४ रोजी पार पडणार आहे. यासाठी जिल्हा निवडणूक यंत्रणेमार्फत आवश्यक तयारी अंतिम टप्प्यात आहे. या प्रक्रियेत उमेदवार, उमेदवार प्रतिनिधी यांचीही महत्वाची भूमिका असणार आहे. सर्व उमेदवारांनी आपल्या मतमोजणी प्रतिनिधींची नावे लवकरात लवकर जिल्हाधिकारी कार्यालयाला कळवावीत. तसेच या प्रतिनिधींना मतमोजणी विषयक प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच कोणालाही भ्रमणध्वनी घेवून मतमोजणीच्या ठिकाणी प्रवेश मिळणार नसल्याने कोणीही आपले भ्रमणध्वनी सोबत आणू नयेत, असे आवाहनही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले. तसेच मतमोजणीसाठी भारत निवडणूक आयोगाने दोन निरीक्षकांची नियुक्ती केल्याचे सांगितले.

लातूर येथील शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतन येथे ४ जून २०२४ रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी पार पडणार आहे. सकाळी ८ वाजता टपाली मतपत्रिकांच्या मतमोजणीला सुरुवात होईल. यासाठी १० टेबल लावण्यात येणार आहेत. तसेच मतदान यंत्रावरील (ईव्हीएम) मतमोजणीसाठी विधानसभा क्षेत्रनिहाय सहा मतमोजणी कक्ष करण्यात आले असून प्रत्येक कक्षात १४ टेबलवर मतमोजणी होणार आहे. तसेच प्रत्येक विधानसभा क्षेत्रनिहाय ५ व्हीव्हीपॅटमधील चिठ्ठ्यांची मोजणी केली जाणार असल्याचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम यांनी सांगितले. तसेच उमेदवारांनी मतमोजणी प्रतिनिधी नियुक्तीबाबत करावयाच्या कार्यवाहीची विस्तृत माहिती दिली आणि यावेळी उपस्थित करण्यात आलेल्या शंकांचे निरसन केले.




**स्टीम एज्युकेशन सेंटर समर कॅम्प २ दिक्षांत समारंभात मुख्य पाहुणे प्रा. श्री. मन्मथप्पा पंचाक्षरी संस्थेचे संचालक श्री. ओमप्रकाश झुरळे इतर कर्मचारी व विद्यार्थी संच.**

# यशवंत ची उज्वल यशाची परंपरा कायम

## विज्ञान शाखेचा ९९.३२% तर कला शाखेचा ९४.११% निकाल

अहमदपूर दि. २१ (कारामुंगीकर) : येथील यशवंत ज्युनिअर कॉलेजने यशाची परंपरा कायम राखली असून विज्ञान शाखेचा ९९.३२% तर कला शाखेचा ९४.११% निकाल लागला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ पुणे अंतर्गत घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा ऑनलाईन निकाल आज दिनांक २१ मे २०२४ रोजी दुपारी १.०० वाजता लागला असून यशवंत जूनियर कॉलेजने यशस्वी परंपरा कायम राखली असून विज्ञान शाखेतून विशेष प्राविण्यामध्ये ०६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत तर प्रथम श्रेणी मधून ४८, द्वितीय श्रेणीतून ८३ , आणि तृतीय श्रेणीतून ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेमधून महाविद्यालयातून ८४.१३% गुण घेऊन केंद्रे साहिल संग्राम हा विद्यार्थी प्रथम, ननीर शंतनु सतीश हा ८२ टक्के गुण घेऊन द्वितीय तर शेख आशमीराफातिमा नईमुद्दीन व येलमटे प्रवीण ज्ञानोबा यांनी अनुक्रमे ७८.११% गुण घेऊन तृतीय स्थानी आले आहेत.

बारावी कला मधून विशेष प्राविण्यामध्ये ०१ विद्यार्थी, प्रथम श्रेणी मधून ११, द्वितीय श्रेणीतून ४१ , आणि तृतीय श्रेणीतून ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यामध्ये शेख सानिया शफीयोदिन यांनी ७५.५० टक्के गुण घेऊन प्रथम, होळकर सृष्टी शंकरराव हिने ७०.१७ टक्के गुण घेऊन द्वितीय तर कांबळे रुपेश नामदेव यांनी ६९.५०% गुण घेऊन तृतीय आला आहे.

१२ वी एमसीव्हीसी व्होकेशनल कोर्स इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी ८५.७१%, इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी चा ८७.५०% तर ऑटोमोबाईल टेक्नॉलॉजी चा ८५.७१% टक्के निकाल लागला असून सरासरी निकाल ८६.३६ टक्के लागला आहे.

सदरील यशस्वी विद्यार्थ्यांचे व प्राध्यापकांचे टागोर शिक्षण समितीचे सचिव, दलित मित्र, शिक्षण महर्षी डी.बी. लोहारे गुरुजी, अध्यक्ष डॉ. अशोक सांगवीकर, सहसचिव डॉ. सुनितताई चवळे, प्राचार्य गजानन शिंदे, उपप्राचार्य प्रा. मुजम्मिल सय्यद, प्रा. विश्वंभर स्वामी, प्रा. शिवशंकर पाटील, विज्ञान प्रमुख प्रा. दिनेश तोंडारे, कला प्रमुख प्रा. सतीश ननीर, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. रविशंकर इरफळे, डॉ. बालाजी गोविंदराव कारामुंगीकर, परीक्षा विभाग प्रमुख प्रा. अनमोल पटवारी, प्रा. राहुल देशमुख, उप मुख्याध्यापक राजकुमार घोटे, पर्यवेक्षक राम तत्तापुरे आदींनी अभिनंदन केले आहे.

### दयानंद वाणिज्य महाविद्यालयात हिंसाचार विरोधी दिवस साजरा

लातूर, ता.१४: दयानंद वाणिज्य महाविद्यालयात जयंती समितीच्या वतीने दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवससाजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांनी तरुणांना दहशतवाद, आणि त्याचा मानवी जीवनावर होणारा परिणाम याविषयी माहिती देण्यासाठी दहशतवाद विरोधी दिन पाळला जात असल्याचे सांगितले तर ग्रंथपाल प्रा.विठ्ठल जाधव यांनी हा दिवस माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची पुण्यतिथी असल्याचे सांगून २१ मे १९९१ रोजी राजीव गांधी यांची हत्या करण्यात आली. तसेच दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन, त्याचा इतिहास आणि त्याचे महत्त्व याबद्दल माहिती देऊन दहशतवाद विरोधी दिवसाची शपथ सर्वाना दिली.

# एस. ए. जागीरदार ज्यु. कॉलेजचे घवघवीत यश

## बोर्ड परीक्षेचा विज्ञान शाखेचा ९६ टक्के तर कलेचा ८० टक्के निकाल

अहमदपूर दि. २२ (कारामुंगीकर): येथून जवळच असलेल्या काळेगाव येथील एस ए जागीरदार ज्युनिअर कॉलेजचा विज्ञान शाखेचा ९६.१३% तर कला शाखेचा ८०.१७ टक्के निकाल लागला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, अहमदपूर तालुक्यातील काळेगाव येथील एस. ए.जागीरदार ज्यु. कॉलेजने एच.एस. सी. बोर्ड परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले असून विज्ञान शाखेचा ९०.१३% तर कला शाखेचा ८०.१७% निकाल लागला आहे. विज्ञान शाखेमधून देशमुख अ. वाहेद हारुन ८२.८३% गुण घेऊन प्रथम आली आहे. तर काजी जोया मुजिबोदिन ७६.८३% हे द्वितीय आले असून शेख अरहम मोहमद ७५% गुण घेऊन तृतीय आले आहेत. तर चतुर्थ स्थानी अनुक्रमेलदेशमुख जैद मो. हनीफ ७४.३३%, पठाण उममे हाणि ताजखान ७४.१७% गुण घेऊन आले आहेत. कला शाखेचा एकूण निकाल ८०.१७% लागला आहे. कला शाखेतून तंबोळी तसकिन मगदूम ६६.८३% टक्के गुण घेऊन प्रथम, शेख आयशा जमिल ६५.१७% गुण घेऊन द्वितीय तर अनुक्रमे शेख फरहीन नादिर ६३.६७, फकिर समिर जमिर ६३% गुण घेऊन तृतीय आले आहेत. सय्यद जोहा हसनोदीन ६१.३३% गुण घेऊन चतुर्थ स्थानी आहेत. सदरील यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष अब्दुल मुजीब पटेल, प्राचार्य हबीब अबूबकर, सेवानिवृत्ति मुख्याध्यापक अब्दुल लतीफ हाफिज , मुख्याध्यापक मुफ्ती खलीक,डॉ. देशमुख नय्यर मॅडम, शेख लायक , प्रा सय्यद जब्बार, प्रा पठाण आसिफ, प्रा सय्यद मुखतार यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालयाचा बारावी बोर्ड परीक्षेचा ९५.०४ टक्के निकाल

हडोळती प्रतिनिधी:- नुकताच २०२४ चा लातूर बोर्डाकडून बारावीचा निकाल जाहीर करण्यात आला. लातूर विभागाचा ९२.३६% निकाल लागला.फेब्रुवारी मार्च महिन्यात घेण्यात आलेल्या कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय हडोळती चा बारावी बोर्ड परीक्षेचा ९५.०४% निकाल लागला.

अधिक माहिती अशी की, कला शाखेचा एकूण निकाल ९६%. सर्वप्रथम आलेली विद्यार्थिनी कु.देशमुख आयशा हरूनमिया-७७.८३% द्वितीय- बडे हरीओम किशन-७७.५०%. तृतीय -कुमारी गायकवाड कोमल गणेश-७७.१७%. वाणिज्य शाखेचा एकूण निकाल ९२.५९%. वाणिज्य शाखेतून सर्वप्रथम कु. विराळे मोनिका राजेश्र्वर-७५.५०%. द्वितीय- कु.गोताळे शुभांगी सोनबा-७३.५०%. तृतीय- कु.भोगे निकिता संजय-७१.६७%. विज्ञान शाखेचा एकूण निकाल ९५.२०%. विज्ञान शाखेतून सर्वप्रथम कु.खुरेशी सिमरन बासुमिया-७२.५०%. द्वितीय -कु. पुट्टेवार राजश्री नारायण -७१.६७%.तृतीय - कु. लोहकरे दिव्या रामराव -७१.५०%. दयानंद कनिष्ठ महाविद्यालयातील किमान कौशल्य विभागाचा एकूण निकाल ८९.६५%. वरील उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांची कौतुक किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा.पी.टी.पवार सर,सचिव डॉ. निलेश भैय्या पवार,प्राचार्य डॉ.डी.डी.बच्चेवार सर,कार्यकारी संचालक मा.प्राचार्य जोगदंड आय.एम.सर,प्राचार्य कौडगावे जी.व्ही.सर,मुख्याध्यापक श्री. कानवटे सर,पर्यवेक्षक प्रा. सूर्यवंशी एम.डी.सर,पर्यवेक्षक प्रा.बिलापट्टे एस.टी.,केंद्रप्रमुख मुचाटे ए.आर. ताई,शिक्षक, प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व गावकऱ्यांच्या वतीने उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# महात्मा फुले क. महाविद्यालय कबनसांगवीची १०० टक्के निकालाची परंपरा कायम

अहमदपूर दि. २२ (कारामुंगीकर) माहे फेब्रुवारी २०२४ मध्ये झालेल्या बारावी बोर्डाच्या परीक्षेत इथून जवळच असलेल्या चाकूर तालुक्यातील कबनसांगवी येथील महात्मा फुले क. महाविद्यालयाचा १०० % निकाल लागला असून यशाची परंपरा कायम राखली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक मंडळ पुणे अंतर्गत घेण्यात आलेल्या बारावी बोर्ड परीक्षेमध्ये कबनसांगवी येथील महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा शंभर टक्के निकाल लागला आहे. बोर्डाच्या परीक्षेत विज्ञान शाखेतून ७३ विद्यार्थी बसले होते सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यात विषेश प्राविण्यात ०१, प्रथम श्रेणी ५२, व्दितीय श्रेणी २० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेचाही शंभर टक्के निकाल लागला असून कला शाखेतून ३० विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यात प्रथम श्रेणी १०, द्वितीय श्रेणी १८, उत्तीर्ण श्रेणी ०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेतून गुणानुकमे सातानुरे दिव्या हिने ७६ .८३ % गुण घेऊन प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. मुंगडे शर्वरी हिने. ७२.६७ % घेऊन द्वितीय आली आहे तर साळूंके अंजली ७२ .०० % गुण घेऊन तृतीय आली आहे.

कला शाखेतून कसबे सूरज (प्रथम), सांगवे प्रणव (द्वितीय), फरकांडे अनिकेश ( तृतीय ) आले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.अशोकराव सांगवीकर, सचिव. दलित मित्र, शिक्षण महर्षी डि.बी. लोहारे गुरुजी, सहसचिव डॉ. सुनितताई चवळे, प्राचार्य गंपले, प्रा. अंगद बोबडे , प्रा. अरूण खसे, प्रा. श्रीमती उषा सरवदे, प्रा. अर्चना इंचुरे , प्रा.पी.एन बिरादार, प्रा . संजय बिरादार, प्रा.गजानन वाडकर, सर्व शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# महात्मा गांधी महाविद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम

अहमदपूर : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१२ वी परीक्षा फेब्रुवारी मार्च २०२४ चा निकाल जाहीर झाला असून महात्मा गांधी महाविद्यालय ने उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. विज्ञान शाखेचा निकाल ९७.५२टक्के लागला असून १५ विद्यार्थी विशेष प्राविण्य व ९५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

विज्ञान शाखेत महाविद्यालयातून अभय गुट्टे हा ८८.१७ टक्के गुण घेऊन सर्वप्रथम, पियुश कनकदंडे हा ८३.६७ टक्के गुण घेऊन सर्व द्वितीय,स्नेहल दळवे ही ८३.१७ टक्के गुण घेऊन सर्व तृतीय आला आहे. आणि ८० टक्के पेक्षा जास्त ७ विद्यार्थी आहेत. वाणिज्य शाखेचा निकाल ९६.४६ टक्के लागला असून ८० टक्केच्यावर १४ विद्यार्थी आहेत, २० विद्यार्थी विशेष प्राविण्य व ६० विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. वाणिज्य शाखेत सना तेतैमुर पठाण ही ९६ टक्के गुण घेऊन सर्वप्रथम, अपूर्वा पाटील ही ९५.५० टक्के घेऊन सर्वद्वितीय व अनुष्का माने ही ९५.३३ टक्के गुण घेऊन सर्व तृतीय आला आहे.कला शाखेचा निकाल ९०.२४ टक्के लागला असून १२ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

कला शाखेत संविधान ढवळे हा ७०.८३ टक्के गुण घेऊन सर्वप्रथम, वैष्णवी माकणे ही ७०.५०टक्के गुण घेऊन सर्व द्वितीय आला आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष ॲड. किशनराव बेडकुळे, सचिव अँड पी. डी. कदम, उपाध्यक्ष ॲड विजयकुमार देशमुख, उपाध्यक्ष युवराज पाटील सहसचिव सुरेशराव देशमुख, सर्व संचालक, प्राचार्य डॉ. एस. आर. शेळके, उपप्राचार्य प्रा. पी. मी. बाभुळगांवकर, सीईटी सेल प्रमुख प्रा. हेमंत पाटील, पर्यवेक्षक प्रा. डॉ.जे. पी. कुलकर्णी, प्रा. ए. एन. शिंदे, कार्यालयीन अधिक्षक श्री. डी. के. गाजरे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.

# दहावीच्या विद्यार्थ्यांनो निकालासाठी तयार व्हा

मुंबई : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून काल बारावीचा निकाल जाहीर करण्यात आला. यावर्षी बारावीचा निकाल ९३.३७ टक्के लागला असून यंदाही मुलींनीच बाजी मारली. बारावीच्या निकालानंतर आता दहावीच्या विद्यार्थ्यांची धाकधूक वाढू लागली आहे. दहावीचा निकाल कधी? असा प्रश्न विचारला जात आहे. याबाबत दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाची अपडेट समोर येत आहे.

नुकतेच जाहीर झालेल्या बारावीच्या निकालासंबंधी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यासाठी शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी बारावीचे विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले त्यांचे अभिनंदन करत शिक्षणमंत्र्यांनी दहावीचा निकालाबाबत माहिती दिली.

या दिवशी लागणार दहावीचा निकाल

दहावीचा निकाल २७ मे पर्यंत लागेल, अशी माहिती केसरकर यांनी दिली. अकरावीची प्रवेश प्रक्रिया २४ तारखेपासून सुरु होत आहे. राज्यातील पाच शहरांमध्ये ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया होत असते तर इतर शहरांमध्ये ऑफलाईन प्रवेशप्रक्रिया होते, असं दीपक केसरकर म्हणाले. बारावीचा निकाल यावेळी आठ दिवस आधीच जाहीर झाला आहे. दोन दिवसांपूर्वीच निकाल जाहीर होणार होता. मात्र, राज्यात पाचव्या टप्प्यातील मतदानामुळे निकालास विलंब झाला, असं दीपक केसरकर यांनी सांगितले. ज्या विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षेला बसायचं असल्यास ते बसू शकतात, असंही त्यांनी स्पष्ट केलं. १६ जुलैच्या दरम्यान पुन्हा परीक्षा होणार आहे. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना आणि श्रेणी सुधारण्यासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना अजून एक संधी आहे. ऑगस्टमध्ये निकाल जाहीर होईल, असं केसरकर म्हणाले.

### कस्तुरबा गांधी कनिष्ठ महाविद्यालयाच्या बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल शंभर टक्के निकाल

अहमदपूर: लातूर विभागीय बोर्डाच्या वतीने फेब्रुवारी / मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला असून येथील कस्तुरबा गांधी कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के व कला शाखेचा निकाल ९७ टक्के लागला आहे.

बारावी बोर्ड परीक्षेत विज्ञान शाखेत आनम शेख हिने ७६.८३ टक्के घेऊन महाविद्यालयात प्रथम तर अजिंक्य पाटील ७६.१९ टक्के गुण घेऊन द्वितीय आणि कपिलेश्र्वर मेनकुदळे हा ७५.१७ टक्के गुण घेऊन तिसरा आला आहे. कला शाखेत निकिता कदम हिने ८२. ५० टक्के गुण घेऊन प्रथम तर प्रतिक्षा मटके हिने ७४ टक्के गुण घेऊन द्वितीय आणि साधना कदम हिने ६७ टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांक आला आहे.

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष प्राध्यापक डॉ. बी.डी. उगिले संस्थेची सचिव तथा प्राचार्य सारिका जटाळ, प्रा. उमाकांत पटणे ,प्रा. सीमा मुंडे, प्रा .मनीषा उगिले, प्रा .रत्नाकर मुंगल. प्रा.सचिन सुरवसे , प्रा आनंद ससाने, प्रा. विजय भुरकापल्ले ,प्रा. संतोष फुलमंटे, विनोद महालिंगे, राहुल उगीले , विद्यासागर पाटील आणि उमाकांत भसमपुरे यांनी अभिनंदन केले आहे.

# पु. अहिल्यादेवीने याही वर्षी निकालाची परंपरा कायम ठेवली

अहमदपूर: तालुक्यातील सांगवी सु येथील पु अहिल्यादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल दरवर्षीप्रमाणे यंदाही चांगला लागला असून विज्ञान शाखेचा निकाल १००% लागला आहे.विज्ञान शाखेत तब्बल १०१ विद्यार्थी परीक्षेला सामोरे गेले होते.

त्यापैकी सर्वच १०१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून दहा विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत.विज्ञान शाखेतून सर्वप्रथम उदगिरे सुमीत शरद ८१.८३%, द्वितीय यादव एकनाथ अर्जून ८१%,तर तृतीय स्थानावर प्रत्येकी ७८.३३% घेवून काळोजी जान्हवी नागनाथ व पाटील आदिती अशोक हे आले आहेत. तर धीरज मुळे, सुमीत लिमये, असिया पठाण हे विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले.कला शाखेचे एकूण ७१ विद्यार्थी परीक्षेला सामोरे गेले होते त्यापैकी ६२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.म्हणजेच कला शाखेचा निकाल ८७.३२% लागला असून कला शाखेत स्नेहा कोतवाडे हिने ८१.६७% घेऊन सर्वप्रथम आली तर निकिता गायकवाड ८०.५०% घेऊन द्वितीय आली तर तृप्ती फुलमंटे ८०.३३% घेऊन तृतीय आली.या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष तथा भाजपाचे प्रदेश प्रवक्ते गणेश हाके पाटील, संस्थेच्या सचिव तथा भाजपाच्या महिला मोर्चाच्या प्रदेश सचिव प्राचार्या रेखाताई तरडे हाके, संस्थेच्या उपाध्यक्षा ड. मानसी हाके, संस्थेचे कोषाध्यक्ष अमरदीप हाके, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे, विस्तार अधिकारी मन्नान शेख, केंद्र प्रमुख रमाकांत खंदारे आदींनी केले.

# राज्यात वातावरणाचा कहर!

मुंबई/पुणे : राज्यातील तापमानात सातत्याने वाढ होत आहे. कुठे उन्हाचा चटका बसत आहे. तर कुठे अवकाळीचा जोर पाहायला मिळत आहे. कोकणात मान्सून पूर्व पावसाने जोर धरला असून कोकण, साता-यात अवकाळी पावसामुळे शेतक-यांचे लाखोंचे नुकसान झाले आहे. तर उर्वरित राज्यामध्ये अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला असून पुढील काही दिवस बहुतांश ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अहमदनगर, जळगाव, नाशिक, रत्नागिरी, कोल्हापूर, सातारा, रायगड, सिंधुदुर्ग, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह तुफान पावसाची शक्यता आहे.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, दक्षिण कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, आणि सोसाट्याचा वा-यासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, मान्सून अंदमान निकोबार बेटांवर दाखल झाला आहे, ही एक आनंदाची बातमी आहे. मान्सूनची चाहूल लागली असून देशात मान्सून लवकरच दाखल होण्याची शक्यता आहे. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मान्सून दाखल होईल, असा अंदाज आहे. मान्सून अंदमान निकोबारमध्ये दाखल झाल्यानंतर आता पुढे सरकण्यास सुरुवात झाली आहे. २४ तासांत दक्षिण-पूर्व अरबी समुद्रासह मालदीवच्या काही भागात मान्सूनचा प्रभाव जाणवू शकतो. दक्षिण बंगालचा उपसागर, अंदमान आणि निकोबार बेटांतील काही भागांमध्ये नैऋत्य मान्सून पुढे जाण्यासाठी परिस्थिती अनुकूल असल्यामुळे अनेक राज्यांमध्ये पावसाचे वातावरण तयार झाले आहे.

साता-यात पत्रे उडाली

कोयना परिसरात वादळी वा-यासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. सातारा जिल्ह्यातल्या पाटणमध्येही मुसळधार पाऊस कोसळत आहे. विजांचा कडकडाटासह जोरदार पाऊस कोसळत आहे. वादळी वा-यामुळे पाटण आरल गावांमधील आठ घरांचे पत्रे उडाले आहे. त्याशिवाय शेतीचेही मोठे नुकसान झाले आहे. पाच दिवसापासून पाटणमध्ये सायंकाळच्या वेळेस वारे आणि मुसळधार पाऊस कोसळत आहे.

# महावितरणची मान्सूनपुर्व कामे अंतीम टप्प्यात

लातूर, दि. २२ मे : पावसाळ्यामधे वीजग्राहकांना अखंडीत वीजपुरवठा करता यावा या दृष्टिने दरवर्षी महावितरणच्या वतीने मान्सूनपुर्व देखभाल दुरूस्तीची कामे हाती घेतली जातात. यामध्ये विद्युत यंत्रणेला अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्या छाटने, रोहीत्रांची देखभाल त्याचबरोबर उपकेंद्रामधील दुरूस्ती आदी कामांचा समावेश असतो. लातूर परिमंडळातील मान्सूनपुर्व कामांना आता वेग आला असून ७०-७५ टक्के कामे पुर्णत्वास आली आहेत. महावितरणचे कर्मचारी पुर्ण क्षमतेने देखभाल दुरूस्तीच्या कामात व्यस्त आहेत. त्यामुळे वीजग्राहकांनी वीजपुरवठा खंडीत झालेल्या काळात सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

पावसाळ्यामध्ये वीजपुरवठा सुरळीत रहावा यासाठी रखरखत्या उन्हातही महावितरणचे कर्मचारी सातत्याने कार्यरत आहेत. परंतु विद्युत यंत्रणांच्या देखभाल व दुरुस्तीचे कामे करण्यासाठी त्या-त्या भागातील वीजपुरवठा खंडित करावाच लागतो, सर्व भागाचा वीज पुरवठा खंडित न करता टप्प्या टप्प्याने कामे करून तेवढाच भाग खंडित करून त्या भागातील दुरुस्ती कामे केली जातात. ही कामे पावसाळ्यामध्ये ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित होऊन जास्त वेळ बंद राहू नये म्हणून वीज वाहिनीला स्पर्श करत असलेल्या झाडाच्या फांद्या छाटने, फुटलेले पीन इंसुलेटर तपासणे व बदलणे, रोहीत्रांची ऑईल पातळी तपासणी, ऑइल गळती थांबवणे, वीजवाहिनींचे खराब झालेले लाईटनिंग अरेस्टर बदली करणे, वीजहवाहिन्यांचे खराब झालेले जंपर बदली करणे, जीर्ण झालेल्या वायर बदलणे, उपकेंद्रातील सर्व यांत्रिक बाबीची व यंत्रणा यांची तपासणी करणे व त्याची दुरुस्ती करणे. तसेच प्रत्यक्ष वेळेवर आढळणाऱ्या त्रुटी दुर करणे, अशा प्रकारची अनेक कामे केली जातात. मात्र सदर कामे करीत असताना नाईलाजास्तव काही काळासाठी वीजपुरवठा खंडित करावा लागतो. दुरूस्तीची कामे केल्यानंतर सुद्धा अनेक वेळा जोरदार वादळी वारा व पावसामुळे झाडे, फांद्या पडून वीज वाहिनी तुटने, वीज तारांवरील डिस्क इंसुलेटर फुटने अशा घटना घडत असतात त्यामुळे महावितरणची यंत्रणा पूर्ववत व सुरळीत करण्यासाठी कामे करावी लागतात. मात्र अगोदर प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्यामुळे गतीने वीज पुरवठा सुरळीत करण्यास मदत होते. वाढत्या तापमानामूळे ग्राहकांना विजेअभावी होणाऱ्या त्रासाची महावितरणला जाणीव आहेच. मात्र देखभाल दुरुस्तीची कामे वीज यंत्रणेच्या हिताची तसेच अखंडित, सुरळीत व सुरक्षित ग्राहक सेवेसाठी असून ग्राहकांनी वीजपुरवठा बंद असलेल्या काळात थोडासा संयम राखून महावितरणला सहकार्य करावे असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

**शिवराज पाटील**

शिवराज पाटील चाकूरकर
व्यक्तिमत्व आहे महान
कधीच कोणास ते
समजत नाहीत लहान !!

शांतीप्रिय स्वभाव त्यांचा
नाही लालसा मनात
वेगळीच प्रतिमा आहे
त्यांची सर्व जनात !!

नेता कोण्या जातीचा न
धर्माचा
असे आहेत त्यांचे विचार
सर्व धर्म समभाव
सद्सदविवेक बुद्धी आणि
सदाचार !!

घोडे सवारी, चित्र काढणे
छंद असे छान छान
देवघर घराचे नाव ठेवले
विचार किती त्यांचे महान !!

खानदानी संपत्ती तरी
गर्व ना कधी केला
देशासाठीच त्यांनी त्यांचा
जन्म अर्पण केला !!

चाकूरकरांचे विशेष प्रेम
आहे साहेबांवर
देवा अशीच कृपा असू दे
सतत त्यांच्यावर !!

पुस्तके प्रिय त्यांना
पुस्तकांना समजतात ते
चांगला शिक्षक
चाकूर चा पुत्र सदाशिव
आहे त्यांचा अंगरक्षक !!

मला लाभले असे माहेर
किती मी भाग्यशाली
चाकूरकरांना अतिप्रिय
साहेब तुमची खुशाली !!

**-सौ.अनिता कंठे/वलांडे**
शिरूरअनंतपाळ, लातूर

**पान १ वरून**

### अखेर अल्पवयीन...

केलेले कृत्य हे अत्यंत भीषण असे आहे, त्यामुळे त्यांच्यावर खटला चालवण्यासाठी परवानगी देण्यात यावी अशी मागणी पोलिसांच्या वतीने करण्यात आली.

पोलिसांनी नव्या कलमाची वाढ केली

पुण्यातील कल्याणीनगरमधील अपघाताला कारणीभूत ठरलेल्या अल्पवयीन मुलावर दाखल गुन्ह्यात पोलिसांनी नव्या कलमाची वाढ केली आहे. त्यानंतर अल्पवयीन आरोपी मुलाने कोर्टात हजेरी लावली आहे. मद्यधुंद अवस्थेत कार चालवल्याप्रकरणी अल्पवयीन मुलावर १८५ कलमाच्या अंतर्गत नव्याने गुन्हा दाखल करण्यात आला. याआधी त्याच्यावर कलम ३०४ अंतर्गत सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र अल्पवयीन असल्याच्या कारणावरुन न्यायालयाने त्याला जामीन मंजूर केला होता.

### स्वातंत्र्याचा...

जावं लागेल, कारण त्या कायद्यामध्ये त्यांची ऑर्डर रिन्यू करण्याचा अधिकार हा त्यांना आहे. त्यांनी जर रिन्यू केली नाही तर तुम्हाला आमच्याकडे येता येईल. वरच्या कोर्टाच्या आदेशानुसार, ती ऑर्डर रिन्यू करण्यास गेली आहे. कदाचित आज किंवा उद्या ज्युएनाईल जस्टिस्ट बोर्डचं रिवीजनमधील ऑर्डर अपेक्षित आहे. मला वाटतं वरच्या कोर्टातील व्यूव्ह बघता, ते योग्य ऑर्डर देतील. पण त्यांनी जर दिली नाही तर पोलीस वरच्या कोर्टात पुन्हा जातील. पोलिसांनी ठरवलं आहे की अशाप्रकारे दारु पिऊन, विना नंबरची गाडी चालवत कुणालाही मारण्याचा अधिकार नाही. या प्रकरणात जिथपर्यंत जावं लागेल तिथपर्यंत जाण्याची भूमिका पोलिसांची आहे.

त्या सर्वांवर पोलिसांनी कारवाई केली

देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुलाच्या वडिलांवर गुन्हा दाखल झाला आहे. कारण कायद्यानुसार आपला मुलगा अज्ञान आहे हे माहिती असूनही गाडी देणं हा गुन्हा आहे, त्यामुळे पोलिसांनी त्यांच्यावर कारवाई केली आहे. ज्यांनी अंडर एज अर्थात अल्पवयीनांना दारु सर्व्ह केली, त्यांच्यावर कारवाई झाली आहे. चार लोकांना अरेस्ट करण्यात आलं आहे. आजच कोर्टाने त्यांना चार दिवसांची रिमांड दिली आहे. त्याशिवाय पुढची कारवाई पोलीस करणार आहेत.

फडणवीसांचं पालकांना आवाहन

ज्युवेनाईल ॲक्ट अंतर्गत अल्पवयीन मुलाने चूक केली असली तरी पहिली कारवाई ही पालकांवर केली जाते, त्यामुळे मुलांच्या हाती स्टिअरिंग देण्याच्या आधी पालकांनी विचार करावा असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी दिला. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे, स्वातंत्र्याचा स्वैराचार होऊ देऊ नका असं आवाहन फडणवीसांनी राज्यातल्या पालकांना केलं.

### संविधान...

सूचना दिली आहे. संविधान धोक्यात आहे अशा प्रकारची वक्तव्यं न करण्याचा इशारा खरगेंना देण्यात आला आहे.

### आरटीओ...

रुपये काय आहेत नवे नियम?- किमान १ एकर भूखंड आवश्यक (चारचाकीसाठी २ एकर), - ड्रायव्हिंग टेस्ट देण्यासाठी पुरेशी सुविधा, - प्रशिक्षक हा किमान १२ वी उत्तीर्ण व पाच वर्षांचा अनुभव असावा, - हलक्या वाहनांसाठी ४ आठवड्यांत २९ तासांचे प्रशिक्षण (८ तास थेअरी २१ तास प्रात्यक्षिक), - अवजड वाहनांसाठी ६ आठवड्यात ३९ तासांचे प्रशिक्षण (८ तास थेअरी ३१ तास प्रात्यक्षिक)

### डाळ महागली...

बाजारात ८० रुपये व टोमॅटो ६० रुपये प्रति किलोवर गेला असून शंभरीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. शिवाय सर्वच भाज्या किमान ८० रुपये किलो झाल्याने सर्वसामान्यांचे हाल होत आहेत.

डाळींचे दर

तूर डाळ १७० रु.
उडीद डाळ १३० रु.
मूग डाळ १२० रु.
मठ डाळ १३० रु.
हरभरा डाळ ८२ रु.

सरकारी डाळ ७० ने विक्री?

हरभरा डाळीची सर्वाधिक विक्री होत असते. त्यानंतर तूर डाळीला मागणी असते. सरकारी डाळ सध्या मॉलमध्ये विक्रीला ठेवण्यात आली आहे. ६० रुपये किलोने हरभरा डाळ विकत आहे. काही लोक हीच डाळ खरेदी करून बाजारात ७० ने विक्रीचा प्रयत्न करीत असल्याचे व्यापारी म्हणत आहेत. अवकाळीचा डाळीवर परिणाम

डाळींमध्ये सर्वांत तूर डाळ महाग असल्याचे चित्र आहे. मागील तीन महिन्यांत किलोमागे २० रुपयांनी, तर वर्षभरात ४० रुपयांनी तूर डाळ महागली. मागील हंगामात अवकाळी पावसाने तुरीच्या उत्पादनावर परिणाम झाला होता. अशीच परिस्थिती राहिल्यास ऑगस्ट सप्टेंबरपर्यंत दर १९० ते २०० पर्यंत जातील, असा अंदाज व्यापारी व्यक्त करत आहेत.

यशवंत - धाराशिव जिल्हा
गुरुवार दि. २३ मे २०२४
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com



## एस.पी. ज्युनिअर कॉलेजचा सलग पाचव्या वर्षी १०० टक्के निकाल

परंडा दि.२१ (प्रतिनिधी) - उच्च माध्यमिक १२ वी बोर्ड परीक्षेचा निकालामध्ये शांतादेवी पाटील (एस. पी.) ज्युनिअर कॉलेजचा निकाल याही वर्षी १०० टक्के लागला आहे. निकालाची ही परंपरा सलग ५ व्या वर्षी कायम राखली आहे.

यामध्ये कॉलेजमधून कु अंजली सुरेश घाडगे - ८७.३३ गुण मिळवत पहिला क्रमांक पटकावला. तर कु ज्ञानेश्वरी संतोष गोफणे - ८५.८३ टक्के गुण घेत दुसरा व सुरज हनुमंत काळे याने ८५.१७ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. तसेच सायली सतीश शिंदे - ८०.३३ टक्के, गौरी महादेव हांडे - ८०.१७ टक्के, प्रसाद धनंजय पाटील - ७९.६७ टक्के, साक्षी सिद्धेश्वर गुडे - ७८.८३ टक्के, अंजली अंबादास शिंदे - ७८.१७ टक्के, प्रतीक्षा संजय ठवरे - ७७.६७ टक्के, राजेश चंदनसिंह सल्ले - ७७.५० टक्के, आर्या सुनील पाटील ७७ टक्के, प्रगती सोमनाथ पाडुळे - ७६.३३ टक्के, हर्षवर्धन सचिन भांडे - ७६.१७ टक्के गुण प्राप्त करत विशेष प्राविण्य मिळवत उत्तीर्ण झाले. तर वैष्णवी विजयकुमार शिंदे - ७३.१७ टक्के, पृथ्वीराज मधुकर सुरवसे - ७२.५० टक्के, पृथ्वीराज भारत मेहेर - ७२ टक्के, महेश महाजन कोलते - ७०.३३ टक्के, कौसर हसन शेख - ६८.१७ टक्के गुण मिळवत प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थी, पालक, शिक्षक व कर्मचारी यांचे महाविद्यालयाचे संस्थापक डॉ प्रतापसिंह पाटील, आमदार तथा उपाध्यक्ष डॉ राहुल पाटील, सचिव डॉ उदयसिंह पाटील, संस्थेच्या संचालिका डॉ शिल्पा पाटील व प्राचार्य संतोष भांडवलकर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# मोक्का गुन्ह्यात तडीपार असलेल्या सशस्त्र दरोडेखोरांच्या मुसक्या आवळल्या - कुलकर्णी

धाराशिव दि.२२ (प्रतिनिधी) – सशस्त्र दरोडा व इतर विविध प्रकारच्या गंभीर गुन्ह्यांमध्ये सराईत असलेल्या तिघांच्या मुसक्या आवळल्या असल्याची माहिती पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दि.२१ मे रोजी दिली. धाराशिव जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक गौहर हसन, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना पोलीस अधीक्षक कुलकर्णी म्हणाले की, पुणे जिल्ह्यातील मोक्का टोळीचा प्रमुख विनोद शिवाजी जामदरे वय ३५ वर्षे व त्याचे इतर ४ साथीदारांसह येरमाळा पोलीस ठाणे हद्दीमध्ये शस्त्रासह दरोडा टाकण्याच्या तयारीत असल्याची गोपनिय माहीती धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना दि. २० मे रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

या माहीतीच्या आधारे माझ्या व अपर पोलीस अधिक्षक गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे, पोलीस हवालदार शौकत पठाण, प्रकाश औताडे, जावेद काझी, फरहान पठाण, चालक पोलीस हवालदारसुभाषचौरे हे येरमाळा परीसरात रात्र गस्तीसाठी रवाना झाले होते. दरम्यान रात्रगस्त करीत असताना दि.२१ मे रोजी पहाटे १.५० वाजण्याच्या सुमारास चोराखळी शिवार, धुळे-सोलापुर राष्ट्रीय महामार्गावरील कामत हॉटेलजवळ गेले असता त्या ठिकाणी ५ व्यक्ती संशयीत अवस्थेत दिसले. त्यांना विचारपूस करण्यासाठी त्यांच्याकडे जात असताना पोलीस पथकाची चाहुल लागताच ते अंधाराचा फायदा घेऊन पळुन जाऊ लागले. मात्र त्यांचा पाठलाग करुन ५ पैकी ३ जणांना ताब्यात घेतले. तर दोघेजण तेथून पळून जाण्यात यशस्वी झाल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच घटनास्थळावर बारकाईने पाहणी केली असता तेथे एका गावठी पिस्टलचे मॅगझीन मिळून आले. तर त्या तिघांच्या हातामध्ये एक कत्ती व एक कटावणी मिळून आली. यावरुन ते तिघेजण शस्त्रासह दरोडा टाकण्यासाठी आलेले असल्याची खात्री संबंधित गस्तीवर असलेल्या पोलिसांची झाली.

त्यामुळे त्यांना विश्र्वासात घेऊन अधिक विचारपूस केली असता त्यांनी त्यांची नावे विनोद शिवाजी जामदारे (वय ३५ वर्ष), सिंहगड रोड, वडगाव बुद्रुक, जाधव नगर, पुणे, मुळ गाव परंडा तालुक्यातील लोणारवाडी, बाबासाहेब व्यंकट भायगुडे (वय २५ वर्ष) साईनगर, कोराड वस्ती, हिंगणीपूर, पुणे, मुळ गाव परंडा तालुक्यातील वाटेफळ, ता परंडा व गणेश दिलीप मस्कर (वय २५ वर्ष) रा. स्वारगेट, पुणे अशी सांगितली. तर पळून गेलेल्या दोघाजणांची नावे आकाश सुभाष गाडे (वय २७ वर्षे), रा. सिंहगड रोड, माणिक बाग, रामनगर, पुणे व समाधान आगलावे (वय २५ वर्षे), रा. माणकेश्र्वर, ता. परंडा अशी नावे त्यांनी सांगितल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष म्हणजे त्यांचा गुन्हेगारी अभिलेख तपासला असता आरोपी विनोद जामदारे याच्या विरुध्द सिंहगड पोलीस ठाण्यात येथे मोक्का, दरोडा, खुन, खुनाचा प्रयत्न, खंडणी, आर्म एक्ट, जबरी चोरी, धमकी देणे असे १२ गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्यास पुणे शहर पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड आयुक्तालय व पुणे जिल्हा कार्यक्षेत्रातुन २ वर्षासाठी हद्दपार केलेले असून दि.८ मेपासून तो आंबी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये रहावयास असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले. तरन आरोपी गणेश दिलीप म्हसकर व आकाश सुभाष गाडे यांच्यावर दरोडा, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी असे ६ गुन्हे पुणे येथे दाखल असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच पळून गेलेल्या दोघाजणांची अधिक माहिती घेतली असता आरोपी आकाश गाडे याच्या हातामध्ये गावठी पिस्टल होते. पिस्टल हाताळत असताना मॅगझीन घटनास्थळी पडली आणि आरोपी आकाश गाडे हा पिस्टल घेऊन पळून गेला होता. मात्र त्याला बार्शी



पोलीस ठाण्याच्या पोलीसांनी बार्शी परीसरामध्ये मॅगझीन नसलेल्या पिस्टलसह पकडले असल्याची खात्रीलायक माहीती मिळाली असल्याचे त्यांनी सांगितले. तरताब्यात घेतलेल्या ३ आरोपींकडे मिळालेल्या कत्ती, कटावणी व मॅगझीन या शस्त्रांसह येरमाळा पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या विरुध्द व पळुन गेलेले २ आरोपी या सर्वांच्या विरुद्ध येरमाळा पोलीस ठाण्यात गु.र.नं. १३८/२४ कलम ३९९, ४०२ भा.दं.वि. सह ३, २५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस करीत असल्याचे त्यांनी सांगितले. ही कामगिरी मी व अपर पोलीस अधिक्षक गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे, पोलीस हवालदार शौकत पठाण, प्रकाश औताडे, जावेद काझी, फरहान पठाण, चालक पोलीस हवालदारसुभाषचौरे यांच्या पथकाने केली असल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले.

# घराशेजारील एअरटेलच्या टॉवरचे काम न थांबविल्यास कुटुंबासह आमरण उपोषणाचा इशारा



धाराशिव दि.२१ (प्रतिनिधी) – राहत्या घराला लागून एरटेलचे टॉवर उभा करण्यात येत आहे. त्यामुळे कच्च्या घरातील कुंटुंबाच्या जिवीतास धोका होत असल्याने एरटेल टॉवरचे काम थांबवून चौकशी करुन न्याय देण्यात यावा. अन्यथा तहसील कार्यालयासमोर कुटुंबासह आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा संबंधितांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना दिला आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, वाशी तालुक्यातील पिंपळगाव लिंगी येथील रत्नदीप ज्ञानोबा गाडे व आनंद किसन गाडे यांच्या राहत्या घराला लागून एरटेलचे टॉवर उभा करत असल्यामुळे कच्च्या घरातील कुंटुंबांच्या जिवीतास धोका होत आहे. विशेष म्हणजे गाडे हे अनुसुचीत जातीचे असून अपंग आहेत. तर त्यांची परिस्थिती नाजूक असून त्यांची कच्ची घरे आहेत. तसेच त्यांच्या शेजारील शेतकरी बालाजी विश्वंभर बोरकर यांचा गट नं ५७५ असून गाडे यांच्या घरापासून १० फूट गावठाण आहे. तरी देखील त्या शेतकऱ्याने गाडे यांच्या भिंतीला लागून एरटेलच्या टॉवरचे काम सुरु केलेले आहे. त्यामुळे गाडे यांच्या दगड मातीच्या घराला जमीनदोस्त होण्याची वेळ येईल. या ठिकाणी टॉवर उभा करु नका म्हणून विनंती केली. परंतू ते ऐकण्याच्या मनस्थितीत नाहीत, उलट काय करायचे ते करा ? अशी धमकी देतात. ते एरटेल टॉवरचे काम बंद न केल्यास वाशी तहसील कार्यालयासमोर सहकुंटुंब आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा त्यांनी दिला आहे.

## गुंतवणूक व शेअर बाजाराचे फायदे या विषयात पदव्युत्तर झाल्याबद्दल अॅड, टोणगे यांचा सत्कार

कळंब दि.२२ (प्रतिनिधी) – कळंब शहरातील प्रसिद्ध बांधकाम साहित्याचे व्यापारी दिलीपराव टोणगे यांचे चिरंजीव ड.प्रफुल्ल दिलीप टोणगे (B. A. L L B. L L.M)यांनी राष्ट्रीय प्रतिभुती बाजार संस्थान मुंबई (NISM)अंतर्गत महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी मुंबई मधुन पोष्ट ग्रॅज्युएशन LL.M.गुंतवणुक व शेअर बाजाराचे फायदे या विषयात पुर्ण केल्या बद्दल बिक्कड सर मित्र परिवाराच्या वतीने दैनिक लोकमत चे तालुका प्रतिनिधी बालाजी आडसुळ व उद्योजक विठ्ठल माने, मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या प्रसंगी बोलताना ड प्रफुल्ल टोणगे यांनी मेडिकल व इंजिनिअरींग क्षेत्रा व्यतिरिक्त देशात विविध क्षेत्रात करिअर करण्यासाठी नवयुवक व विद्यार्थ्यांना भरपुर संधी आहेत. कठोर परिश्रम केल्यास याचा फायदा मिळतो असे प्रतिपादन केले.या प्रसंगी उपक्रमशिल शिक्षक महादेव खराटे, निशिकांत आडसुळ, कालिदास वनवे, व्यापारी दिलीप टोणगे, सतिश टोणगे,कर सल्लागार प्रतिक टोणगे , अशोक शिंपले उपस्थित होते

# धोकादायक इमारतींच्या बांधकामासाठी करण्यासाठी परवानगी घ्यावी – फड

### पावसाळ्यात रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारती

धाराशिव (प्रतिनिधी) – पावसाचे दिवस जवळ आले असून धाराशिव शहरातील रस्त्यांच्या कडेला मोडकळीस आलेल्या व धोकादायक इमारतींचे बांधकाम करुन घ्यावे. त्यासाठी रितसर परवानगी घ्यावी असे आवाहन धाराशिव नगर परिषदेच्या मुख्याधिकारी वसुधा फड यांनी केले आहे.

महाराष्ट्र नगर पालिका, नगर पंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम १९५ (१) अन्वये जाहीर सूचना धाराशिव शहरातील मिळकतधारकांनी पावसाळ्याचे दिवस येत आहेत. आपल्या इमारतीचा कोणताही भाग धोकादायक स्थितीत, पडावयास झालेला असल्यास अथवा काही भाग अर्धवट पडलेल्या स्थितीत असल्यास तो भाग त्वरित काढून टाकावा. सदरच्या पडावयास झालेल्या भागाची किरकोळ दुरुस्ती असेल तर ती नगरपरिषदेची पूर्वपरवानगी घेवून पडावयास झालेल्या किंवा जीर्ण अवस्थेत असलेल्या भागाची दुरुस्ती करुन घ्यावी. जुने बांधकाम पाडून नवीन बांधकाम करावयाचे झाल्यास तसे विहीत प्रस्ताव नगर परिषदेकडे दाखल करुन रितसर परवानगी घेवून बांधकाम करावे असे आवाहन फड यांनी केले आहे. तसेच आपल्या घरातील व अन्य रहिवाशांच्या जीविताचे रक्षण करावे. रस्त्यास व कडेस धोकादायक इमारत असल्यास रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांचे जीवितास कोणताही धोका पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी. यासाठी संबंधित नागरिकांनी वेळीच दक्षता न घेतल्यास कोणतीही वित्तीय अगर जीवित हानी झाल्यास त्यास नगर परिषद जबाबदार राहणार नाही. धोकादायक इमारतीमुळे कोणतीही वित्तीय अगर जीवित हानी झाल्यास मिळकतधारकांची जबाबदारी राहील, याची नोंद घ्यावी. धोकादायक इमारतींबाबत किंवा जागेबाबत वाद असल्यास न्यायालयाचे कोणतेही आदेश असल्यास त्याचा अवमान होणार नाही याची दक्षता घ्यावी. धोकादायक इमारतीबाबत न्यायालयाचे निदर्शनास आणून न्यायालयाची पूर्वपरवानगी घेवून कार्यवाही करण्यात यावी. याबाबत स्पष्ट नोंद घ्यावी. नगर परिषदेस सहकार्य करावे, असे आवाहन फड यांनी केले आहे.

# वागदरी येथे कृषी विभागाच्यावतीने खरीप हंगाम पूर्व मार्गदर्शन



उमरगा दि.२२ (प्रतिनिधी) – तालुक्यातील वागदरी येथे खरिप हंगामपूर्व नियोजन बैठक दि.२१ मे रोजी घेण्यात आली.

यावेळी खरीप हंगामातील मुख्य पीक सोयाबिनची बियाणे उगवण क्षमता तपासणी प्रात्यक्षिक व बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक करून दाखविले. रुंद सरी वरंबा पद्धतीने (B.B.F.) पेरणी, टोकण पद्धतीने सोयाबीन पिकाची लागवड करणे, महाडिबिटीवरील योजना शाश्र्वत सिंचनासाठी शेततळे योजना, फळबाग लागवड योजना आणि कृषी विभागाच्या विविध योजना विषयी माहिती कृषी सहाय्यक पूजा सुर्यवंशी यांनी दिली. गोगलगाय नियंत्रण विषयी मशागतीय पद्धतीने नियंत्रण करण्यासाठी जमिनीची खोल नांगरट करणे तसेच बांधांची स्वच्छता करणे याबद्दल माहिती दिली. वागदरी येथील मार्गदर्शन शिबिरास गावातील सरपंच, उपसरपंच व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काळे यांनी ज्युदो खेळाडूंना सरावासाठी दिल्या मॅट

धाराशिव (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील ज्युदो खेळाडूंसाठी जिल्हा नाविन्यपूर्ण योजनेतून ज्युदोमॅट उपलब्ध करून देण्यात आले. या ज्युदो मॅटचे पूजन भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष तथा जिल्हा ज्युदो संघटनेचे अध्यक्ष नितीन काळे यांच्या हस्ते करून मॅट खेळाडूंना सरावासाठी सुपूर्द करण्यात आल्या.

धाराशिव जिल्ह्यातील खेळाडूंची कामगिरी नेहमीच उल्लेखनीय राहिलेली आहे, आहे त्या सुविधेवर मैदानी गाजवणारे खेळाडूंसाठी आधुनिक सोयीसुविधा उपलब्ध झाल्या तर ते आंतरराष्ट्रीय स्तरावर जिल्ह्याचे नाव झळकावू शकतात. याच दृष्टीने या खेळाडूंसाठी मॅटमुळे अधिक सराव करणे हे सोयीचे होईल काळे यांनी सांगितले. दि.६ जून रोजी चीन येथे होणाऱ्या मॉडर्न पेन्टॅथलॉन लेझर रन या क्रीडा स्पर्धेसाठी योगिनी उमाकांत साळुंके हिची निवड झाल्याबद्दल तिचा सत्कार काळे



यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा ज्युदो संघटनेचे सचिव प्रवीण गडदे, कोषाध्यक्ष अभय वाघोलीकर, क्रीडा भारतीचे जिल्हा उपाध्यक्ष रामकृष्ण खडके, जिल्हा एथलेटिक्स संघटनेचे सचिव योगेश थोरबोले, जिल्हा मॉडर्न पेन्टॅथलॉन संघटनेचे सचिव ज्ञानेश्वर भुतेकर, गोविंद मराठे जुदोपटू व पालक उपस्थित होते.

# जिल्ह्याचा १२ वीचा निकाल ८९.७८ टक्के निकालात देखील मुलींनीच मारली बाजी

धाराशिव दि.२१ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र १२ वी परीक्षेचा निकाल दि.२१ मे रोजी ऑनलाईन जाहीर झाला. या परिक्षेसाठी जिल्ह्यातील १६ हजार ३६३ मुला-मुलींनी परिक्षा दिली होती. त्यापैकी १४ हजार ६९२ मुले-मुली उत्तीर्ण झाले असून उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८९.७८ टक्के आहे. यंदाच्या निकालात ८६.७६ टक्के मुले तर ९३.५१ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या असून या निकालामध्ये देखील मुलींनीच बाजी मारली आहे.

धाराशिव जिल्ह्यातील १६ हजार ६६३ विद्यार्थ्यांनी आपली नावे परीक्षेसाठी प्रविष्ट केली होती. त्यापैकी १६ हजार ३६३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यापैकी १४ हजार ६९३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये विशेष प्राविण्य मिळविलेले १८४३ तर प्रथम श्रेणीत ६१०२ तसेच द्वितीय श्रेणीमध्ये ५९१० व ८३७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तालुका निहाय उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या धाराशिव - ४३१७, भूम - ५६५, कळंब - १३३४, लोहारा - १२९८, उमरगा - ३४१७, परंडा - ९००, तुळजापूर - २४६५ व वाशी - ३९५ तर मुला-मुलींचे तालुका निहाय उत्तीर्ण टक्केवारीचे प्रमाण पुढीलप्रमाणे - धाराशिव - मुले - ८९.२० तर मुली - ९२.६६ एकूण ९० टक्के, भूम - मुले ७७.०२ तर मुले ९०.९० एकूण ८३.३३, कळंब - मुले ८२.४६ तर मुली ९१.१२ एकूण ८६.५१ टक्के, लोहारा - मुले - ९१.९१ तर मुली - ९७.३८ एकूण ९४.१९, उमरगा - मुले - ८८.७० तर मुली - ९४.७० एकूण ८८.७०, परंडा - मुले - ९४.९३ तर मुली - ९३.२५ एकूण ८८.३२, तुळजापूर - मुले - ८४.२४ तर मुली - ९४.४६ एकूण ८८.७० व वाशी - मुले - ७६.१६ तर मुली - ९२.४३ एकूण - ८४.९४ टक्के प्रमाण आहे.

# श्रीपतराव भोसले उच्च माध्यमिक विद्यालयाच्या निकालाची परंपरा कायम

धाराशिव दि.२२ (प्रतिनिधी) – श्रीपतराव भोसले हायस्कूल हे लातूर विभागात नंबर दोनशे हायस्कूल असून या महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या सर्वाधिक आहे. विद्यार्थी संख्या सर्वाधिक असताना देखील निकालाची टक्केवारी देखील चांगली आहे. त्यामुळे दहावी मध्ये जिल्ह्यातील पास झालेल्या विद्यार्थ्यांनी इतरत्र शिक्षणासाठी जाऊन शिक्षणावर होणारा खर्च टाळावा. कारण या हायस्कूलमध्ये उच्च दर्जाचे शिक्षण दिले जात असल्यामुळे पालकांनी देखील आपल्या पाल्यांना या शाळेतच दाखल करावे. या हायस्कूलचा बारावी बोर्ड परीक्षामध्ये निकाल चांगला लागला असून निकालाची परंपरा कायम राखली असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष सुधीर पाटील यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दि.२२ मे रोजी दिली.

श्रीपतराव भोसले हायस्कूलच्या प्रशासकीय कार्यालयात आयोजित करण्यात



आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी आदित्य पाटील, मुख्याध्यापक साहेबराव देशमुख आदी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेतील विद्यार्थ्यांचा पत्रकारांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पुढे बोलताना पाटील म्हणाले की, या परीक्षेत श्रीतपराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने लातूर विभागात आपल्या दैदिप्यमान यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयातील १२ वी बोर्ड परीक्षेसाठी सर्वाधिक विद्यार्थी संख्या असूनही उल्लेखनीय यश विद्यालयाने मिळविले आहे. विज्ञान शाखेतून एकूण ८६४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिलेली होती, त्यापैकी ८४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यातील २४१ विद्यार्थी हे विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेले आहेत. या शाखेचा सरासरी निकाल ९८.२६ टक्के एवढा आहे. विज्ञान शाखेमधून प्रथम क्रमांक दिरगुळे प्रथमेश सितारा‍म शेकडा ५४३ गुण ९२.५० टक्के व्दितीय कु.पवार स्नेहल विजय ५४१ गुण ९१ टक्के तसेच तृतीय क्रमाक कु.सांळुके ऋतुजा जयवंत ५४० गुण ९० टक्के प्राप्त केले. विद्यालयाच्या कला शाखेतुन २५१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती, त्यापैकी १९९ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. त्यातील १२ विद्यार्थी हे विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले असल्याचे त्यांनी सांगितले. या परीक्षेला एकूण ४५ विद्यार्थी गैरहजर होते. या शाखेचा सरासरी निकाल ९८ टक्के एवढा आहे. कला शाखेमधुन प्रथम क्रमांक कु.आहेर कोमल बाळासाहेब ५५४ गुण ९२.३३ टक्के, व्दितीय कु. शिंदे निकिता बाळासाहेब ५३६ गुण ८९.३३, तृतीय कु.तांबारे अमृता किरण ५२७ गुण ८७.८३ टक्के आहे. तसेच वाणिज्य शाखेतून १२२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती, त्यापैकी ११८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यातील २० विद्यार्थी हे विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले असून या शाखेचा सरासरी निकाल ९७.४७ टक्के असल्याचे त्यांनी नमूद केले. तर वाणिज्य शाखेमधुन प्रथम क्रमांक तांबे रामदास लक्ष्मण ५५२ गुण ९२ टक्के, व्दितीय क्रमांकाचे दोन विद्यार्थी, कु. रोटे वैष्णवी महादेव ५३५, गुण ८९.१७ टक्के, व लांडे रोहित ईश्र्वर ५३५, गुण ८९.१७ टक्के व तृतीय क्रमांक कु.मोरे किर्ती प्रकाश ५३२ गुण ८८.६७ गुण मिळविले असल्याचे पाटील यांनी सांगितले. यावेळी विद्यार्थी, पालक, पत्रकार, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.



# येरोळ परिसरात पेरणीपूर्व शेती मशागतीच्या कामाची लगबग

प्रशांत तांबोळकर

शिरूरआनंतपाळ : पावसाळा एक महिन्यावर येऊन ठेपला आहे. खरीप हंगामापूर्वी शेतीची मशागत करण्याच्या कामाला सुरूवात झाली आहे. मागील वर्षी पावसाळा वेळेवर सुरू झाला होता. त्यामुळे शेतकऱ्यांनी लगेच पेरणी केली होती. यावर्षी सुध्दा लवकर पावसाळा सुरू होईल, व मुबलक प्रमाणात पाऊस पडेल असा अंदाज हवामान खात्याचा वृत्तविले असल्याने शेतकरी पेरणीपुर्व मशागतीच्या कामाला लागला आहे. मशागतीची कामे वेगाने व्हावी, यासाठी बैलाऐवजी ट्रॅटर व इतर अधुनिक यंत्राचा वापर केला जात आहे.

एकीकडे लग्नसराईची धुम तर दुसरीकडे मशागतीची कामे यामुळे शेतकऱ्यांची धांदल उडत आहे. मागील वर्षी येरोळ व परिसरात ऐन सोयाबीन काढणीच्यावेळी अतिवृष्टीने सोयाबीन व तूर पीकाचे मोठे नुकसान झाले.अतिवृष्टीचा फटका मागील वर्षी खरीप हंगामाला बसला होता. खरीपातील तोटा भरुन काढण्यासाठी शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात गहु, हरभरा व ज्वारीसह इतर पिकाची मोठ्या प्रमाणात पेरणी केली. मात्र, त्यावरही निसर्गाने हल्ला केल्याने रब्बी पिकाचे नुकसान केले. रब्बीची तुट भरुन काढण्यासाठी सिंचनाची सोय असलेल्या बहुतांश शेतकऱ्यांनी उन्हाळी भुईमूंग पिकाची लागवड केली आहे. पावसाळा सुरु होण्यसाठी एक महिन्याचा कालावधी असला तरी भारनियमनामुळे यावर्षी शेतात पीके घेता आली नाही. काळ बदलत चालला आहे आणि काळानुरुप शेती सुध्दा यांत्रिक पद्धतीने करण्यावर शेतकरी जोर देत आहेत. चाऱ्याची वाढती टंचाई लक्षात घेऊन बहुतांश शेतकरी मशागतीसाठी बैलाऐवजी ट्रॅटरसारख्या यंत्राचा वापर करताना दिसून येत आहेत. यंत्रामुळे अल्पावधीतच मशागत करणे शक्य असल्याने बैलजोड्याही नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. वर्षभराचा घर खर्च घरातील मुलामुलींचे लग्न, आजारपण व इतरही खर्च यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असला तरी त्याला पावसाळ्यात पेरणीची व्यवस्था करावीच लागणार आहे. त्यामुळे पेरणीसाठी लागणारे बि-बियाणे, खते यासाठी पैशाची जुळवा जुळव कशी करावी, या विवंचनेत शेतकरी दिसून येत आहेत. पुन्हा एकदा शेतकरी कामाला लागला आहे.

# जिवनात सन्मर्गावर वाटचाल करण्यासाठी स्वचित्ताची साधना हीच पहिली शर्थ असते : रामकुमार रायवाडीकर

लातूर / प्रतिनिधी- प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये सन्मार्गावर वाटचाल करण्यासाठी, स्वचित्ताची उत्तम प्रकारे साधना करणे हीच प्रथम अट असते, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते साथी रामकुमार रायवाडीकर यांनी केले. ते २० मे २०२४ रोजी जय भारत प्रभाती मित्र परिवाराच्यावतीने, छ. राजर्षी शाहू महाराज उद्यान लातूर येथे, सेवानिवृत गुणवंत कर्मचा-यांच्या सत्कार प्रसंगी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ दलित मित्र श्री सुरेशराव चव्हाण हे होते. तर श्री श्रीमंत रेड्डी, श्री सुनील कांबळे व आयु. व्यकंटराव काकनाटे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.



सेवा निवृत्ती काळातील आनंददायी सामाजिक जीवन या विषयावर बोलताना रामकुमार रायवाडीकर हे पुढे म्हणाले की, सेवानिवृत्ती नंतरचे जीवन हे अत्यंत त्यागी व अनुभव परिपक्व असेच असते. ते पुढे अतिशय संयमी व समर्पितपणे उपकारक अशा समाधानी पद्धतीने जगणे अपेक्षित असते. जो शीलवान व प्रज्ञावान असतो तो न्यायी असतो. तो सत्यवचनी आणि कर्तव्याप्रती प्रामाणिक असतो. अशा व्यक्तीवर लोक आणि समाज अपार प्रेम करतात. श्री गणपतराव डावरे यांच्यासारखे आदर्श व गुणवंत कर्मचारी हे, केवळ खाते वा विभागच नव्हे तर ते मानवतेचा एक उच्च मानबिंदू ठरत असतात, असे ही रायवाडीकर हे म्हणाले. प्रारंभी म आम्हा घरी धन, शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे, यत्न करू ।। राष्ट्रसंत तुकोबारायांच्या या अभंग गायनाने कार्यक्रमाची सुखात करण्यात आली. त्यानंतर अखंड गेली ३६ वर्षे ६ महिने लोकाभिमूख सर्वोत्तम सेवा करून, ३० एप्रिल रोजी जिल्हा पोलिस मुख्यालयातून पी.एस. आय. म्हणून, सेवानिवृत्त झालेल्या श्री गणपतराव डावरे यांचा, श्री शंकरराव तरुडे विळेगावकर या निवृत्त अधिकारी तथा ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते शाल, फेटा व पुष्पहार घालून जाहीर सत्कार करण्यात आला. तसेच एक तरुण उत्तम व्यवसायीक श्री सुर्यकांतजी सरवदे यांचाही, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री मच्छिंद्र गुरमे यांच्या हस्ते शाल, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन हृद्य सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना श्री शिवाजीराव गायकवाड चिखलीकर हे म्हणाले की, निवृत्त पीएसआय श्री गणपतराव डावरे हे एक राज्यस्तरीय गुणवंत खेळाडू होते. सदर सेवेमध्ये त्यांची विशेष खेळाडू म्हणूनच निवड झालेली होती. मितभाषी व प्रेमळ स्वभावाचे श्री डावरे हे, एक समाज भूषण म्हणून सर्वत्र गौरविले गेले आहेत. तर यावेळी श्री गणपतराव डावरे हे आपल्या मनोगतामध्ये म्हणाले की, पोलिस विभागामध्ये अखंडपणे साडे छत्तीस वर्षे साधी तक्रार वा कसल्याही चौकशी विना, सरळ सेवा बजावणे हे एक भयंकर दिव्य असते. मात्र आई- वडीलांचे संस्कार आणि शिक्षणातून मिळालेल्या सामाजिक जाणिवेमुळे हे आपणास शक्य झाले, अशी प्रांजळ व मनस्वी कृत्तज्ञताही श्री डावरे यांनी व्यक्त केली. तसेच श्री सरवदे यांनीही आपले समायोचित मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री लक्ष्मण सुर्यवंशी यांनी केले. तर श्री शिवाजी गायकवाड चिखलीकर यांनी सूत्रसंचालन केले. आणि श्री के. डी. भडीकर यांनी आभार प्रदर्शन केले. या प्रसंगी गोपाळरावतात्या चिकाटे, शिवाजीराव कांबळे, संगमेश्वर वलाकटे, सुनील शिंगे, रामदास टिळे, श्री प्रताप माने, बापूजी गायकवाड, गणपतराव तेलंगे, राजकुमार जाधवपाटील, श्री एम एस पुट्टेवाड, विनय कांबळे, सुधाकर कांबळे, हरिश्चंद्रराजा घोलप, दिगंबर बारसकर, वसंतराव वंजारे, श्री धनराजाप्पा मुतंगे, श्रीपती शिंदे, सौदागरभौजी बनसुडे, डॉ. सुनील पाटील, अकुंश देवकते, मु. अ. श्री गणपतराव पंडगे, शशिकांत बस्तापुरे, श्री माधवराव तेलंग, श्री प्रकाशराव बंडापल्ले बामणीकर, मुन्ना पांचाळ व दिगंबर भोसले आदी उपस्थित होते. सामुहिक राष्ट्रगीत गायनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात करण्यात आली.

# दुरूस्तीकरिता बाभळगाव वीजवाहिनीवरील काही भागाचा वीजपुरवठा बंद राहील

लातूर : वीजयंत्रणेच्या तातडीच्या दुरूस्ती व देखभाली करिता बाभळगाव वीजवाहिनीवरील काही भागांचा वीजपुरवठा आज (दि.२१ मे) सकाळी ९ ते दुपारी ०१ वाजेपर्यंत बंद राहील. संबंधीत वीजग्राहकांनी नोंद घेवून सहकार्य करावे असे आवाहन महावितरणने केले आहे.

लातूर शहराच्या दक्षीण उपविभाग कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या ११ केव्ही बाभळगाव वीजवाहिनीच्या मान्सुनपूर्व देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी लाकडी अड्डा, बालाजी नगर, बस्तापुरे नगर, शास्त्री नगर, अंजली नगर, सारोळा रोड, इंदिरा नगर, जयभीम नगर, तुळजाभवानी नगर, राजीव नगर, शिक्षक कॉलनी, म्हसोबा नगर आदी परिसरातील वीजपुरवठा सकाळी ९ ते दुपारी ०१ वाजेपर्यंत बंद राहील.

वीज ग्राहकांनी याची नोंद घेवून महावितरणला सहकार्य करावे. सदरील देखभाल व दुरूस्तीचे काम निर्धारीत वेळेपूर्वी पूर्ण झाल्यास त्वरीत वीज पुरवठा पुर्ववत चालू करण्यात येईल.

# अब की बार ४२ पार!

लातूर : प्रतिनिधी- वाढती लोकसंख्या, दिवसेंदवस वनांचे कमी होत चाललेले क्षेत्र, बेसुमार होत असलेली वृक्षतोड यामुळे तापमानवाढ ही जागतिक समस्या बनली आहे. या उन्हाळ्यात नागरिकांना तापमानवाढीचा प्रचंड प्रमाणात त्रास होतो आहे. ज्या लातूरचा पारा दरवर्षी ३८ च्या आसपास राहायचा तो यंदा ४२ च्या वरी गेल्याने नागरिकांनी सावध होण्याची गरज असून, येत्या पावसाळ्यात प्रत्येकाने वृक्ष लागवड आणि संवर्धन मोहीम हाती घ्यावी, असे आवाहन करण्यासाठी रविवारी वसुंधरा प्रतिष्ठानच्या वतीने विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. ङ्गअब की बार पारा ४२




पारफ या फलकानी लातूरकरांचे लक्ष वेधून घेतले.

गेल्या अनेक वर्षापासून सातत्याने पर्यावरण क्षेत्राकडे होत चाललेले दुर्लक्ष यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते आहे. जागतिक तापमानवाढ हा जगासमोरील मोठा प्रश्न आहे. लातूर जिल्ह्यात दरवर्षी उन्हाळ्यात तापमानाचा पारा हा ३८ च्या आसपास असायचा. मात्र, यंदा लातूर जिल्ह्यातील औराद शहाजनी येथील पारा ४३ पेक्षाही जास्त होता. ज्याची नोंद महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक तापमान म्हणून झाली होती. शिवाय, या उन्हाळ्यात लातूर जिल्ह्याचा पारा हा ४२ सेल्सिअस पेक्षाही अधिक होता. यामुळे या उन्हाळ्यात नागरिकांना तापमानवाढीचा प्रचंड त्रास सहन करावा लागला. हा त्रास भविष्यात कमी करायचा असेल तर येत्या पावसाळ्यात प्रत्येकाने वृक्ष लागवड आणि संवर्धन करणे अत्यंत महत्वाचे आहे,

याकडे लातूरकरांचे लक्ष वेधण्यासाठी वसुंधरा प्रतिष्ठानच्या वतीने रविवारी छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि जिल्हा क्रीडा संकुल येथे फलक हातात घेऊन जनजागृती केली. अब की बार पारा ४२ पार असे मजकूर असणारे हे फलक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. या उपक्रमात कोझी ग्राफिक्सचे बालाजी गायकवाड, वसुंधरा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.योगेश शर्मा, उपाध्यक्ष रामेश्वर बावळे, कार्याध्यक्ष अमोल आप्पा स्वामी, कार्यकारिणी अध्यक्ष ॲड.डॉ. अजित चिखलीकर, सदस्य वैभव वाघ, पत्रकार महादेव पोलदासे, वुमन्स विंगच्या अध्यक्षा प्रिया मस्के, सदस्या प्रितम जाधव आदींनी सहभाग नोंदवला. या उपक्रमासाठी कोझी ग्राफिक्सची मोठी मदत झाली.

# जी.डी.सी.अँड ए परीक्षेला २४ मेपासून प्रारंभ

लातूर, - सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयामार्फत २४,२५ व २६ मे, २०२४ रोजी जी.डी.सी.अँड ए परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. लातूर शहरातील सिग्नल कॅम्प शासकीय रूग्णालयासमोरील श्री मारवाडी राजस्थान विद्यालय येथे ही परीक्षा होईल. ज्या विद्यार्थ्यांना परीक्षेचे हॉल तिकीट मिळालेले नाही अथवा मोबाईलद्वारे संदेश प्राप्त झालेले नाही, अशा विद्यार्थ्यांनी पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स व अनुषंगिक फोटो ओळखपत्रासह जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, प्रशासकीय इमारत, जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, लातूर येथे किंवा ०२३८२-२४५१९३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा अथवा परीक्षेच्या दोन तास अगोदर परीक्षा केंद्रावर संपर्क साधावा, असे आवाहन लातूर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था तथा चीफ कंडक्टर, जी.डी. सी.अँड ए परीक्षा यांनी केले आहे.

# ऑनलाईन पद्धतीने राज्यस्तरीय कविसंमेलन रंगले!

नांदेड - येथील सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने आयोजित ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आलेले कविसंमेलन राज्यभरातील कवी, कवयित्रींच्या सहभागाने चांगलेच रंगले. फुले शाहू आंबेडकरांच्या विचारतत्वाचे अभ्यासक व प्रसारक सी. एस. पाईकराव यांच्या पाचव्या स्मृतीदिनानिमित्त ऑनलाईन कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. पाईकराव हे शिक्षकी पेशात असूनही त्यांनी समाजाची सेवा केली.

आपल्या विद्यार्थ्यांसह युवक युवती तसेच प्रौढांना योग्य मार्गदर्शन केले. अनेकवेळा विविध प्रसंगानुरूप सामाजिक प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. सी. एस. पाईकराव यांच्या स्मरणार्थ बाप माझा या विषयावर सहभागी कवी कवयित्रींनी कविता सादर केल्या. यावेळी संयोजक बाबुराव पाईकराव, प्रज्ञाधर ढवळे, प्रा. तानाजी मेटकर, ॲड. संजय भारदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

गुगल मीटच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय ऑनलाईन कविसंमेलनात कवयित्री सुधाताई जाधव ( कोल्हापूर), गझलकारा अनिसा शेख ( पुणे) कवयित्री अनिता भोसले ( कोल्हापूर), डॉ. दिलीप लोखंडे ( धुळे), बाबुराव पाईकराव ( हिंगोली), ॲड. संजय भारदे ( मुखेड), प्रज्ञाधर ढवळे ( नांदेड), प्रा. तानाजी मेटकर ( अर्धापूर), प्रा. राजेश पंडित ( मालेगाव), गंगाप्रसाद बकाल ( असर्जन), बी. जी. कळसे ( नांदेड), साईनाथ रहाटकर ( लोहा) यांनी एकापेक्षा एक सरस आणि सुरस कवितांचे सादरीकरण करुन प्रतिसाद दिला. सूत्रसंचालन प्रा. तानाजी मेटकर यांनी केले तर प्रास्ताविक व आभार प्रदर्शन बाबुराव पाईकराव यांनी केले. या कविसंमेलनाच्या यशस्वीतेसाठी सप्तरंगी साहित्य मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# महात्मा फुले महाविद्यालयात राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन




अहमदपूर , ( प्रतिनिधी )-येथील महात्मा फुले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांचा स्मृतिदिन दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन म्हणून साजरा करण्यात आला.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या राजीव गांधी स्मृतीदिन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. परमेश्वर इंगळे हे होते तर प्रशांत डोंगळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते स्वर्गीय राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. बब्रुवान मोरे यांनी दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त उपस्थितांना शपथ दिली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ .पांडुरंग चिलगर यांनी केले तर आभार अजय मुरमुरे यांनी मानले. यावेळी चंद्रकांत धुमाळे, वामन मलकापूरे, शिवाजी चोपडे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

# धोंड्यामाय कांबळे यांचे निधन

अहमदपूर / प्रतिनिधी- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघर्ष लढ्यातील पहिले शहिद नामांतर विर शहिद पोचिराम कांबळे यांच्या पत्नी धोंड्यामाय पोचिराम कांबळे यांचे आज दि. २१ मे २०२४ रोजी दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर आज दिनांक २१ मे २०२४ रोजी दुपारी १.३० वाजता सिडको - नांदेड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.



त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघर्ष लढ्यात आपला पती वीर पोचिराम कांबळे यांना आत्मिक बळ देण्याचे खूप मोठे सामाजिक काम यांनी केले. त्यांच्यासोबत येणाऱ्या कार्यकर्त्यांना मायेचा आशीर्वाद देऊन रात्री बेरात्री जेवणाची, आराम करण्याची व्यवस्था केली. कार्यकर्त्यांना मातेप्रमाणे वागणूक दिली. अशा या वीर मातेने आज दिनांक २१ मे २०२४ रोजी शेवटचा श्वास घेतला. त्यांच्या मृत्यूमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# नदी जोड प्रकल्पासाठी थेट राष्ट्रपतींना साकडे

लातूर : प्रतिनिधी- देशाची सद्यस्थिती पाहता देशाच्या काही भागात नद्यांना बारा महिने पाणी असल्याने पूर परिस्थिती तर देशाच्या दुस-या बाजूला सातत्याने कोरडा दुष्काळ पडतो आहे. देशात पाण्याचा असमतोल असल्याने अनेक समस्या उद्भवत आहेत. देशात पाण्याचा समतोल राखण्यासाठी आणि पूर भागातील पाणी दुष्काळग्रस्त भागाकडे वळविण्यासाठी नदीजोड प्रकल्प कार्यान्वित होणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. या मागणीसाठी वसुंधरा प्रतिष्ठान ही सामाजिक संस्था २०१६ पासून लढा देत आहे. दरम्यान, वसुंधरा प्रतिष्ठानच्या वतीने नदीजोड प्रकल्प कार्यान्वित व्हावा, यासाठी स्वाक्षरी अभियान राबविले. या जमा नागरिकांच्या स्वाक्षरींचे निवेदन मंगळवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु आणि देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे स्पीड पोस्टद्वारे पाठविण्यात आले.

नदीजोड प्रकल्प कार्यान्वित व्हावा, अशी संकल्पना सर्वप्रथम महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४२ ते १९४५ या काळात मांडली होती. देशात सद्यस्थिती पाहता काही भागात अतिवृष्टी तर काही भागात सातत्याने कोरडा दुष्काळ पडतो आहे. पूर परिस्थिती आणि दुष्काळ परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी शासनाच्या वतीने कोट्यावधी रुपयांचा खर्च केला जातो. देशात पाण्याचा असमतोल असल्याने अनेक समस्या उद्भवत आहेत. पाणी नसल्याने शेतकरी बांधवांना आत्महत्या करण्याची वेळ येत आहे. शिवाय, पाणी नसल्याने त्या भागात रोजगाराचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. देशात एकीकडे पूर परिस्थिती तर दुसरीकडे सातत्याने पडणारा कोरडा दुष्काळ यामुळे देशातील नद्यांना एकत्र जोडल्यास पूर भागातील पाणी दुष्काळग्रस्त भागाकडे वळविणे शक्य होणार आहे. नदीजोड प्रकल्प हा अत्यंत महत्त्वाचा आणि महत्वकांक्षी प्रकल्प असून हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यास देशातील अनेक समस्या मिटू शकतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कल्पनेतील नदीजोड प्रकल्प ही आजची काळाची अत्यंत महत्त्वाची गरज आहे. दरम्यान मधल्या काळात तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी बाजपेयी यांनी देखील नदीजोड प्रकल्पासाठी पावले उचलली होती. मात्र, हा प्रकल्प दिवसेंदिवस रखडत चाललेला आहे. हा प्रकल्प सुरु व्हावा, यासाठी लातूरच्या वसुंधरा प्रतिष्ठानच्या वतीने २०१६ पासून सातत्याने लढा



दिला जातो आहे. वसुंधरा प्रतिष्ठानने या मागणीसाठी नागरिकांच्या स्वाक्षरी मोहिमेचे आयोजन करुन एकूण ३ हजार ९८ स्वाक्षरी जमा केल्या. या जमा स्वाक्षरींचे निवेदन देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे डाक पोस्टद्वारे पाठविण्यात आल्या. यावेळी वसुंधरा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. योगेश शर्मा उपाध्यक्ष रामेश्वर बावळे, कार्यकारिणी अध्यक्ष ॲड. डॉ. अजित चिखलीकर, वृक्ष लागवड अभियान प्रमुख राहुल माशाळकर, लातूर शहाराध्यक्ष उमेशआप्पा ब्याकोडे, वुमन्स विंगच्या अध्यक्षा प्रिया मस्के, सदस्या मोहिनी चांदोरीकर, योगेश महाराज चांदोरीकर आदींची उपस्थिती होती.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# महापुरुषांच्या विचारावर तरूणांनी आपल्या जीवनाची वाटचाल करावी : ना. संजय बनसोडे

उदगीर : मतदार संघातील समाजबांधव हा जागृत असुन मझ्यावर जिवापाड प्रेम केले आहे. समाजबांधवांना निवडणुकीत आपण शब्द दिला होता की भविष्यात गुलबर्गाच्या धर्तीवर शहरात बुध्द विहार उभारणार म्हणून मी शब्द दिला होता तो शब्द आपण पाळला असुन उदगीर शहरात तब्बल २० कोटी रूपयाचे बुध्द विहार उभारत आहोत तथागत भगवान बुध्द व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह मानव मुक्ती साठी ज्या महापुरुषांनी त्याग केला अशा महापुरुषांचा आदर्श आपल्या डोळ्यासमोर ठेवुन ते विचार आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणुन त्यांच्या विचारावरच तरूणांनी आपल्या जीवनाची वाटचाल करावी असे मत ना.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. ते उदगीर शहरात आयोजीत महाकारुणीक तथागत गौतम बुध्द व विश्वरत्न, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त दि.१९ मे रोजी बुध्द - भिम गीतांच्या कार्यक्रमात समाजबांधबवांना संबोधित करत होते.

या कार्यक्रमास भंन्ते नागसेन बोधी, खा.सुधाकर श्रृंगारे, माजी आ.गोविंदराव केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, कार्याध्यक्ष वसंत पाटील, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, रिपाईचे देविदास कांबळे, कुणाल



बागबंदे, भाजपाच्या महिला जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे,चंदा बिरादार,सतिशपाटीलमाणकीकर, राहुल सुतार, बाबासाहेब सुर्यवंशी, अरुण उजेडकर, मुकेश भालेराव, अविनाश गायकवाड, दिपाली औटे, अभिजीट औटे, शफ्फी हाशमी, प्रदीप जोंधळे, चारुशिला पाटील, चंद्रशेखर पाटील, सुशिलकुमार शिंदे, प्रफ्फुल्लकुमार उदगीरकर, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, जळकोट शहरामध्ये बुध्द विहार उभारले असुन त्याचे काम अंतिम टप्यात आहे. उदगीरमध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य - दिव्य पुतळा उभारण्याचे काम चालु आहे. मुंबईमध्ये इंदुमीलच्या जागेवर जगातले सर्वात मोठे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक शासनाच्या वतीने उभारत आहोत आणि महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पदस्पर्शाने पावन झालेला सर्व क्षेत्राचा विकास करत असून ही बाब आपल्या समाजासाठी अभिमानस्पद आहे. दरवर्षी मागावर्गीय विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्यास जाण्यासाठी शासनाच्या वतीने फक्त ५० विद्यार्थी पाठवण्याची व्यवस्था होती मात्र आता यापुढे ५०० विद्यार्थी परदेशात शिक्षणासाठी पाठवण्याची तरतुद आपण केली असल्याचे सांगितले. यावेळी उदगीर - जळकोट तालुक्यातील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवाजी महाविद्यालयाचे मनॅक मूल्यांकन अंतर्गत एनर्जी ऑडिट संपन्न

उदगीर (प्रतिनिधी) : शिवाजी महाविद्यालयाचे मनॅक मूल्यांकनफ अंतर्गत ऊर्जा लेखापरीक्षण करून दि १९ मे ला अहवाल सादर करण्यात आला. एनर्जी ऑडिट इमारतीमध्ये वापरात असलेल्या ऊर्जेच्या नुकसानीच्या जोखमीचे मूल्यांकन करतात. ऊर्जेचे प्रबंधन करून २५ % बचत व्हावी या उद्देशाने प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एम. नवले यांच्या अध्यक्षतेखाली मनॅक मूल्यांकनफअंतर्गत पर्यावरण आराखड्याची बैठक आयोजित करण्यात आली होती.

या प्रसंगी महाऊर्जा महाराष्ट्र शासन एम्पानेलड ऊर्जा



लेखापरीक्षक केदार खमितकर, उपप्राचार्य डॉ. आर. एम. मांजरे, आईक्यूएसी समन्वयक डॉ. व्ही. एम. पवार, डॉ. एस.डी. निटुरे यांची उपस्थित होती.

शाश्वत विकासाच्या अंतर्गत ऊर्जा संवर्धन धोरण शिवाजी महाविद्यालयाने जाहीर केले.

ऊर्जा-कार्यक्षम इमारती कमीत कमी ऊर्जा वापरतात. केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने व्यावसायिक इमारतींचे स्टार रेटिंग २००९ मध्ये भारतात लाँच केला आहे. जो इमारतीमधील ऊर्जा वापरावर आधारित आहे.

या प्रोग्राममध्ये, इमारतींना १ ते ५ स्केलवर रेट केले जाते, ज्यामध्ये ५-स्टार लेबल असलेल्या इमारती सर्वात कार्यक्षम आहेत. महाऊर्जा आणि शिवाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मऊर्जा बचत कार्यक्रमफ अंतर्गत ऊर्जा लेखापरिक्षण करण्यात आले.

वित्तीय वर्ष २०२४ - २५ साठी शिवाजी महाविद्यालयाच्या इमारतीत ऊर्जेचा कार्यक्षम वापर आणि बचतीचे लक्ष्य पॉलिसी मध्ये देण्यात आले.

००००

# दुष्काळाचे दुष्चक्र भेदण्याचा संकल्प

छत्रपती संभाजी नगर :

दिनांक १९ मे २०२४ रविवार दुष्काळी मराठवाड्यासाठी पश्चिम वाहिनी नदी खोऱ्यातील १६८ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याच्या नदी जोड प्रकल्पास २०१९ मध्ये मंजुरी मिळाली.

मात्र आजपर्यंत ओंजळभरही पाणी मराठवाड्याला मिळाले नाही.नदी जोड प्रकल्पाला गती देऊन मराठवाड्याचा दुष्काळ कायमस्वरूपी संपविण्यासाठी अल्प व दीर्घकालीन कालबद्ध कृती कार्यक्रम घोषित करावा अल्पकालीन मध्ये मिशन मोडवर जलसंधारण व धरणातील गाळ काढणे कामे ,शाश्वत व प्रभावी सिंचनाकरिता पाणी वापर संस्थांची मोठ्या प्रमाणात स्थापना व सक्षमीकरण ,अपूर्ण प्रकल्प वेळेत पूर्ण करणे ,कालवा दुरुस्ती व मनुष्यबळ उपलब्धता, पाण्याचा कार्यक्षम व उत्पादक वापराकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ,तर दीर्घकालीन मध्ये नदीजोड प्रकल्पाद्वारे गोदावरीत पाणी वळविणे, कृष्णा मराठवाडा प्रकल्प, विदर्भातील अतिरिक्त पाणी मराठवाड्यात वळविणे .ही कामे झाली पाहिजे याकरिता मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा व आगामी विधानसभा निवडणुकीत सर्व पक्षाने निवडणूक जाहीरनाम्यात मराठवाड्याचा पाणी प्रश्न सोडवण्याचे अभिवचन द्यावे यासाठी मराठवाडा पाणी परिषद प्रयत्नशील राहणार आहे. असे मराठवाडा पाणी परिषदेचे अध्यक्ष नरहरी शिवपुरे म्हणाले.

मराठवाडा पाणी परिषदे तर्फे



रविवारी पाणी प्रश्नावर ग्रामविकास भवन एन टू सिडको येथे बैठक घेण्यात आली. याप्रसंगी आधार जलदूत समितीचे अध्यक्ष मा. पंडित अण्णा शिंदे, प्रेरणा फाउंडेशनचे मा. भाऊसाहेब मते, माजी अधीक्षक अभियंता जलसंपदा विभाग डॉ.जयसिंग हिरे, गट शेती प्रणेते डॉ. भगवानराव कापसे यांनी अनुक्रमे शाश्वत व प्रभावी सिंचनाकरिता पाणी वापर संस्था ,गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना मराठवाड्यासाठी वरदान,मराठवाडा सिंचन अनुशेष निवारणाकरिता कृती कार्यक्रम, ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजना पैठण ,पाण्याच्या कार्यक्षम वापराद्वारे कृषी उत्पादकतेत व उत्पन्नात वाढ या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. उपस्थिता पैकी अनेक मान्यवरांनी दुष्काळ मुक्त मराठवाडा कालबद्ध कार्यक्रमासाठी अनेक मौलिक सूचना केल्या.

अध्यक्षीय समारोपप्रसंगी डॉ. सर्जेराव ठोंबरे म्हणाले दुसरा सिंचन आयोग व वेळोवेळीच्या अनुशेष निवारण समित्याने मराठवाडा सिंचन अनुशेष निवारणाकरिता सुस्पष्ट अशा सूचना केलेल्या आहेत .याची प्रत्यक्षात अंमलबजावणी होण्याची गरज आहे.

याप्रसंगी परिषदेचे उपाध्यक्ष मनोहर सरोदे ,दिनेश पारिक, रामचंद्र पिल्दे ,कैलास तवार, भास्कर उघडे रवींद्र बोडके ,योगिता तौर होके पाटील, संतोष एरंडे, डॉ.बाबासाहेब गोजरे,माऊली मुळे,भरत थोटे,कृष्णा पाटील, अरुण सोनवणे ,प्रा.शिवाजी हुसे ,आपचे वैजिनाथ राठोड व विश्वनाथ दहे यांच्यासह मराठवाड्यातील स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, शेतकरी व युवक यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

शेवटी बाजीराव ढाकणे यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने बैठकीची सांगता झाली.

०००००

## जाहीरनामा

दिवाणी न्यायाधीश क. स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ७६ / २०२४ निशाणी क्र.

अर्जदार अपर्णा भ्र. प्रमोद घोगरे ज्यापेक्षा पती नामे प्रमोद पि. दत्तात्रय घोगरे हे दिनांक १०/०१/२०२४ रोजी मौजे गुरधाळ ता. देवणी जि. लातूर येथे मयत झालेले आहेत.

त्यांचे वारसदार खालीप्रमाणे आहेत.

| अ.क्र | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| ०१ | अपर्णा भ्र. प्रमोद घोगरे | ३० | पत्नी |
| ०२ | प्रतिक पि. प्रमोद घोगरे | १२ | मुलगा |
| ०३ | पियुष पि. प्रमोद घोगरे | ०९ | मुलगा |
| ०४ | धोंडुबाई भ्र. दत्तात्रय घोगरे | ५२ | आई |

यांनी या कोर्टात सदरहू मयताच Heirship certificate/वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरून असे कळविण्यांत येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयाताचे Heirship certificate/वारस प्रमाणपत्र देईल. सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १५/०५/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे. पुढील नेमलेली तारीख :- २०/०६/२०२४.

(आर.टी.शिंदे)
व.लिपीक

(आर.एस.वाघमारे)
प्र.सहायक अधिक्षक

# वाढवणा येथील रस्ता महसुल च्या वतीने केला मोकळा

उदगीर/प्रतिनिधी :

तहसीलदार राम बोरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली मौजे वाढवणा येथील विवाद ग्रस्त असलेला रस्ता तहसीलदार यांच्या आदेशान्वये आज रोजी शेतकऱ्यास खुला करून देण्यात आला सदर नंबर बांधाचा रस्ता एक किलोमीटर लांबीचा व सव्वा आठ फूट रुंदीचा रस्ता असून येथील रस्त्यालगत असलेल्या सर्व शेतकऱ्यांना हा रस्ता अतिक्रमण मुक्त झाल्यामुळे आनंदाचे वातावरण होते प्रसंगी या ठिकाणी उदगीरचे नाही.

तहसिलदार राजेश बेंबळगे वाढवणा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक भीमराव गायकवाड साहेब वाढवणा मंडळा अधिकारी



गणेश हिवरे तलाठी आकाश आलुरे पोलीस कॉन्स्टेबल शिवाजी सोनवणे मनमोहन केंद्रे संजय कलकत्ते शिवाजी केंद्रे महिला पोलीस तयमुन मुजावर उपस्थित होते.

# अतनुरात पालखी सोहळयाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

अतनूर / प्रतिनिधी :

वारकरी संप्रदायामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाला मोठे महत्त्व आहे. यामध्ये सात दिवस विविध प्रकारचे संत वाङ्मय याचा अभ्यास करणाऱ्या हरिभक्त परायण महाराजांकडून संत ज्ञानेश्वरांपासून संत तुकाराम पर्यंत विविध संतांच्या रचना असलेल्या अभंगावर तत्वचिंतन मांडण्यात येते. ज्याद्वारे मनुष्य जन्मात ईश्वर नामाचे विशद केले जाते.

जळकोट तालुक्यातील अतनूर येथील ग्रामदैवत श्री.काशी विश्वनाथ महाराज मंदीरात व संजीवन समाधी घेणारे श्री.संत घाळेप्पा स्वामी महाराज यांच्या १४८ व्या. पुण्यतिथीनिमित्त प्रतिवर्षीप्रमाणे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले असून यावेळी महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार यांचे किर्तन व गाथा पारायण, दुपारी कथेचे आयोजन करण्यात आलेले होते. या अखंड हरिनाम सप्ताहाची बुधवारी सकाळी पहाटे संपुर्ण गावभर पालखी, वीना, महिलांच्या डोक्यावर तुलसी पात्र कळस, विविध देव देवतांची वेशभूषा करून तसेच शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेतील व देवाधिदेव महादेव यांच्या वेशभूषेत, घोडेस्वार, महिला, पुरुष फुगडी खेळ, दिंडी, पताका, टाळ, मृदृंगाच्या गजरात निघालेल्या मिरवणुकीत भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

अतनूर येथील मंदिरात ८ ते १५ मे या कालावधीत कीर्तनसेवा, सकाळी ६ ते ७ श्री.घाळेप्पा स्वामी यांचा रुद्राभिषेक, सकाळी ७ ते १० ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, १०ते १२ गाथ्यावरील भजन, दुपारी २ ते ४ भागवत कथा, तसेच




हरिपाठ, हरिकीर्तन, हरिजागर, पहाटे काकडा आरती सप्ताहाचे आयोजन केले होते. या सप्ताहात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार, ह.भ.प. महाराज यांचे किर्तन झाले. तसेच गुलालाचे कीर्तन ह.भ.प.विश्वनाथ महाराज अतनूरकर, ह.भ.प. दयानंद स्वामी यांच्यासह ह.भ.प.विश्वनाथ स्वामी महाराज,ह.भ.प. जयेश महाराज भाग्यवंते, ह.भ.प.दयानंद स्वामी, काल्याचे किर्तन ह.भ.प. पांडुरंग शिंपले महाराजांच्या काल्याच्या कीर्तनाने अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात संपन्न झाला.

मागील सात दिवसांपासून अतनुरात भक्तिमय वातावरण होते. मंगळवार रोजी भंडारा-महाप्रसाद झाला. त्यानंतर बुधवारी पहाटे पालखी मिरवणूक काढण्यात आली. सोबतच फटाक्यांची अतिषबाजी करण्यात आली. गावातील महिलांनी घरासमोर रांगोळी काढुन पालखी मिरवणुकीचे स्वागत केले. टाळ, मृदृंगाच्या जयघोषात गावकरी, माहेरवाशीनीसह महाराष्ट्र-आंध्रप्रदेश-कर्नाटक-तेलंगना सरहद्द राज्याच्या राज्यअंतर्गत तसेच लातूर-नांदेड सरहद्द सीमावर्ती भागातील भाविक भक्त मिरवणुकीत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तसेच यात्रा कमिटीचे सर्व पदाधिकारी, सदस्य, सेवेकरी आदींसह ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

००००

# शेळगाव येथे नृसिंह जन्मोत्सव उत्साहात साजरी

देगलूर(प्रतिनीधी): तालुक्यातील श्री क्षेत्र शेळगाव (नृसिंह) येथे नृसिंह जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. गावातील व परीसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



तेलंगणा, महाराष्ट्र व कर्नाटक या राज्यातील भावीकांची सुद्धा विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमात नांदेड (उत्तर ) चे लोकप्रिय आमदार बालाजीराव कल्याणकर, जिल्हा प्रमुख जि.प.सदस्य गंगाधर बडुरे , जिल्हा प्रमुख मंगेश कदम,देगलुरचे माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार, येरगीचे सरपंच संतोष पाटील व अनेक राजकीय तसेच प्रशासकीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नृसिंह जन्मोत्सव मध्ये गुलालाचे कीर्तन ह. भ. प. पु. श्री शिवानंद शास्त्री महाराज पैठण यांच्या द्वारे करण्यात आली.दरवर्षी व परंपरे प्रमाणे सायंकाळी गावातील महिला आरती घेऊन श्री नृसिंह स्वामी यांची ओवाळणी करून जन्मोत्सव साजरा केला.

नृसिंह जन्मोत्सव उत्साहात साजरी करण्यासाठी सर्व गावकऱ्यांनी परिश्रम केले.

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी यशाची गुरूकिल्ली देणारे महाविद्यालय

देगलूर(प्रतिनीधी): येथील अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालय म्हणजे ग्रामीण होतकरू विद्यार्थ्यांना यशाची गुरूकिल्ली देणारे महाविद्यालय आहे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.मोहन खताळ यांनी केले .

ते कनिष्ठ विभागातील इयत्ता बारावी चे विद्यार्थी बोर्ड परिक्षेत यशस्वी झाले अशा गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात बोलत होते या वेळी व्यासपीठावर अ.व्या. शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य देवेंद्र मोतेवार,जनार्दन सावकार चिद्रावार ,उपप्राचार्य प्रा.उत्तम कुमार काबंळे उपस्थित होते.

डॉ.खताळ पुढे म्हणाले आगामी शैक्षणिक वर्षांत कोटा येथील शिक्षक गरीब होतकरू विद्यार्थ्यांना शिकविण्यास येणार आहेत तसेच येत्या शैक्षणिक वर्षांपासून पदव्युत्तर एम. एस्सी. प्राणिशास्त्र,अर्थशास्त्र जीएसटी हा विषय सूरू करण्याचा मानस आहे अशी माहिती दिली .

उपप्राचार्य उत्तमकुमार कांबळे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत हे महाविद्यालय पोहचले असून स्पर्धा परिक्षा, जेईई, वैद्यकीय पूर्व परिक्षेचा अभ्यासक्रम महाविद्यालयातच शिकता येणार असल्याची माहिती दिली. लातुर विभागीय शिक्षण मंडळ इयत्ता बारावी कला ,वाणिज्य, विज्ञान व व्यावसायिक अभ्यासक्रमाची परिक्षा फेब्रुवारी -मार्च २४ मधे घेण्यात आली होती या परिक्षेचा निकाल लातूर विभागीय शिक्षण मंडळाने दि २१मे रोजी ऑनलाईन जाहिर केला आहे.

या मधे महाविद्यालयातील कलाशाखेचा७८.३६%वाणिज्य शाखेचा ९६.०७%तर सर्वाधिक विज्ञानशाखेचा.९६.८८.% लागला असूनपरीक्षेतील गुणवंत विद्यार्थीनी विज्ञानशाखेची कु.समिक्षा बिरादार हिला(८५.८३%,)कु.जिरगे अंकिता (८५.८३%),कु दिक्षित मधुरा गिरीश( ८४%,) ओम नल्लावार(८३.८३% ) तसेच कला शाखेत चेंडके मनोज (८३%)कु.चिंचोले पुजा माधव (८१.१७% ) संकेत निलमवार (८०.८३%) वाणिज्य शाखेत कु.कुलकर्णी रूद्राणी श्रीपाद ९५.६७% कु. सातेलीवार सुरभी ९४%, कु.उदगीरे दर्शना९१.३३%



व एमसीव्हीसी चा विद्यार्थी शेख या गुणवंत यशस्वी विद्यार्थ्यांचे अ.व्या.शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य देवेंद्र मोतेवार,जनार्दन सावकार चिद्रावार,प्राचार्य डॉ.मोहन खताळ उपप्राचार्य उत्तमकुमार कांबळे या मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ ;पेढे देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमास अधिक्षक गोविंद जोशी डॉ. व्यकंटेश शेरीकर प्रा एम एम चमकुडे प्रा.प्रमोद गुजे प्रा नाईक बी एम,प्रा भुरे प्रा मल्लूरवार प्रा संतोष वानोळे डॉ लक्षट्टे; प्रा संजय देबडे;वरिष्ठ लिपिक दत्त प्रसन्न साखरे ;नागनाथ बासरे ;गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ९४.८७ टक्के





उदगीर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचा निकाल ९४.८७ टक्के लागला आहे. विज्ञान शाखेत महाविद्यालयातून सर्वप्रथम नरवडे प्रतीक्षा ज्ञानोबा ८६.८३, द्वितीय नागुरे शिवानी परमानंद ८४.१७, तृतीय पाटील पृथ्वीराज प्रशांत आणि जोशी शंतनू संतोष ८२ टक्के. वाणिज्य शाखेत महाविद्यालयातून सर्वप्रथम फफ्रड महेश रामदास ८८.३०, द्वितीय सोमानी वैष्णवी रामेश्वर ८७.६७, तृतीय नाईक अवधूत संतोष ८६.३३. कला शाखेत सर्वप्रथम चौधरी प्रणाली रवींद्र ९१, द्वितीय पवार अयोध्या शिवाजी ७१, तृतीय सूर्यवंशी सुकन्या बालाजी ७०.८३ टक्के गुण प्राप्त केले आहेत. विज्ञान शाखेत १८ विशेष प्राविण्य, ८९ प्रथम श्रेणी, कला शाखेत एक विशेष प्राविण्य, दहा प्रथम श्रेणीत, वाणिज्य शाखेत १६ विशेष प्राविण्य, १९ प्रथम श्रेणीत विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यशवंतांचे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी, उपाध्यक्ष डॉ. रेखा रेड्डी, सचिव रामचंद्र तिरुके, सहसचिव ॲड.एस.टी.पाटील चिघळीकर आणि डॉ.रामप्रसाद लखोटिया, कोषाध्यक्ष भालचंद्र चाकूरकर तसेच सर्व संस्था सदस्य, प्राचार्य डॉ.आर.के.मस्के, उपप्राचार्यडॉ.एस.जी.पाटील, उप प्राचार्य एस.जी.कोडचे, पर्यवेक्षक प्रा.जे.आर.कांदे, प्रा.टी.एन.सगर, प्रा.एस.व्ही.मूडपे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# समर्थ कनिष्ठ महाविद्यालयाचा शेकडा निकाल ९९.३५ टक्के

वाढवणा बु :
तालुक्यातील एकुर्का रोड येथील समर्थ कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मार्च २०२४ च्या बारावी बोर्ड परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले असून महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा एकूण निकाल ९९.३५ टक्के, कला शाखेचा एकूण निकाल ९५.४१ टक्के तर एचएसव्हीसी शाखेचा एकूण निकाल ९३.४७ टक्के लागला आहे.

विज्ञान शाखेतून सोनम शिवकुमार तोंडारे हिने ९०.१७ टक्के गुण घेऊन प्रथम येण्याचा मान मिळविला आहे.

सौंदर्या संतोष अंबेसंगे व सुशील संतोष कोरे या विद्यार्थ्यांनी ८९.३३ टक्के गुण घेऊन व्दितीय आले आहेत. तर शितल उत्तम जाधव व मंथन गोपाळ चव्हाण हे ८८.१७ टक्के गुण घेत तृतीय आले आहेत. कलाशाखेतून आलांडीकर गणेश सुरेश ८४.१७ टक्के गुण घेऊन प्रथम आला आहे. ओम रमेश कुंडगीर व अम्रपाली प्रेमनाथ सोनकांबळे ८२.८३ टक्के गुण घेऊन व्दितीय आले आहेत. तर



रिहाना कबीर पठाण ८२. १७ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. एचएसव्हीसी शाखेतून प्रतिक्षा धनराज सुतार ८५.५० टक्के गुण घेऊन प्रथम आली आहे. अरफ्फान शेख करिम शेख ८१.१७ टक्के गुण घेऊन व्दितीय आला आहे. तर अगलावे यशोदा व्यंकट हि ८०.५० टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. विज्ञान शाखेत एकूण १५५ विद्यार्थी परिक्षेस बसले होते. पैकी १३९ विद्यार्थी विशेष प्राविण्यात उत्तीर्ण झाले आहेत. प्रथम श्रेणीत १४ द्वितीय श्रेणीत एक उत्तीर्ण झाला आहे. कला व एचएसव्हीसी शाखेतून १०९ विद्यार्थी परिक्षेस बसले होते. पैकी ३४ विद्यार्थी विशेष प्राविण्यात, ६७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, तीन विद्यार्थी द्वितीय श्रेणीत, तर १०४ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत आहेत. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थासचिव प्राचार्य प्रमोद चौधरी, पर्यवेक्षक सिद्धार्थ बोडके, संस्था सदस्य प्रा. एम. व्ही. स्वामी, जेष्ठ प्रा. बी. एस. बाबळसुरे, रसूल पठाण याच्यांसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# स्वयंअध्ययनाच्या निष्ठेने कुळभेदालाही झुकवत सर्वश्रेष्ठ ठरलेला निषाधराजा एकलव्य होय - शौर्य पैके

माणूस हरतो तो आपल्या विचारांमुळे. आपल्यातील आत्मविश्वास जाणू न शकल्यामुळे. परंतु ज्याचा आत्मविश्वास प्रबळ आहे, ज्याची स्वयं अध्ययनावर निष्ठा आहे तो माणूस स्वतःबरोबरच इतरांना देखील नवी दिशा देऊन अपयशावर विजय मिळवतो. जरी त्याला कुठलेही जात, धर्म आणि कुळभेद आड आले तरी तो साहस, त्याग, निष्ठा आणि समर्पण या आधारे स्वयअध्यानाच्या जोरावर यशस्वी होतो. असा साहसी सर्वश्रेष्ठ धनुर्धर ज्याने स्वयंअध्ययनाच्या निष्ठेने कुळभेदालाही झुकवले तो म्हणजे एकलव्य होय.असे मत शौर्य पैके याने व्यक्त केले.

शौर्यने सांगितले की धर्नुविद्या शिकुन शिकार करणे व राज्याचे संरक्षण करणे हे प्रत्येक निषाधाचे कर्तव्य आणि कर्म!

एकलव्य पिता निषाधराजा हिरण्यधनु त्यास सांगत की उत्कृष्ट धर्नुधर होणे हे राज्याच्या संरक्षणासाठी तर आई रत्नगर्भा सांगे की सर्वोत्कृष्ट धर्नुधर होणे हे स्वअस्तित्वासाठी! आई वडिलांचे हे शब्द शौर्य सांगत असतांना त्याच्यावर झालेला संस्कारित प्रभाव लक्षात आला.

एकलव्य क्षणाचाही विचार न करता स्वतःच्या उजव्या हाताचा अंगठा कापुन गुरूदक्षिणा देतौ या त्याच्या सांगण्यास सर्व वाचकांच्या टाळ्या पडल्या.

छोटा शौर्य श्रीकृष्ण आणि एकलव्याचे युध्द आणि नितीमत्तेचे बोलणे छान मांडला!

या लहान मुलाने शेवटी सर्वांसमोर जात महत्वाची की माणूस महत्वाचा? कुळभेद मोठे की कर्तृत्व मोठे? माणसापेक्षा त्याचे



कर्म महत्वाचे नाही का? असे प्रश्न करून उपस्थितांच्या विचारांना हात घालण्याचा प्रयत्न केला.

बारा वर्षिय शौर्य नावाप्रमाणे शेवटपर्यंत सभाधिटपणा जगला.

चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत गेल्या १४ वर्षापासून अखंडितपणे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या सोमवारी चालू असलेल्या वाचक संवादाच्या ३१३ व्या विशेष बालवाचक संवादामध्ये विजय देवडे लिखित एकलव्य या साहित्यकृतीवर सहाव्या वर्गात शिकणारा विद्यार्थी शौर्य अर्चना सिद्धेश्वर पैके पुढे बोलताना म्हणाला की, गुरूंची केवळ प्रतिमा डोळ्यासमोर ठेवून धनुर्धर विद्येमध्ये पारंगत होणारा व गुरुदक्षिणा म्हणून या विद्येचे मुख्य आधार असणारा आपल्या उजव्या हाताचा अंगठा दान देणारा एकलव्य हा सर्व विद्यार्थ्यांसाठी एक अत्यंत प्रेरणादायी असून त्याचे हे चरित्र लेखकांनी अत्यंत प्रभावीपणे आपल्यासमोर ठेवले आहे. यातील पात्र त्यांचा संवाद आणि भावना याची सुयोग्य मांडणी देखील केलेली आहे. केवळ ध्वनीचा लक्ष्यवेध घेऊन बाण चालवणारा टिपणारा सर्वोत्कृष्ट धर्नुधर एकलव्य या कादंबरीत एकूण ५१ प्रकरणातून ३६० पानांमध्ये सुंदर चित्रण केले आहे. हे पुस्तक प्रत्येक मुलाने व तरुणांनी वाचली पाहिजे.

यानंतर झालेल्या चर्चेत कु. प्रतिक्षा लोहकरे, कु. दिपाली शेळके, शांता कलबुर्गे, मोहन निडवंचे, बालाजी सुवर्णकार, वर्षाराणी चव्हाण,प्रियंका मुंढे, भागवत जाधव,कु.म्हेत्रे प्रियंका. सुरेखा गुजलवार व ज्ञानोबा मुंढे यांचेसह अनेक लहान मोठ्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी प्रत्येकाच्या प्रश्नांची समर्पक उत्तरे शौर्य ने दिली. शेवटी अध्यक्षीय समारोपात मोमले यांनी शौर्याचे तोंड भरून कौतुक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदित्य भास्कर जाधव यांनी केले तर संवादकाचा परिचय आराध्या तांदळे या मुलीने करून दिला. शेवटी प्रतिभा मुळे यांनी आभार मानले.

या कार्यक्रमास , जेष्ठ नागरिक संघाचे मुरलीधर जाधव, ग्रंथमित्र दीपकबलसुरकर, दि.लिं.होळीकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामभाऊ जाधव, डॉ.बी.एम.शेटकार, ओ.बी.सी. नेते तथा पत्रकार बालाजी सुवर्णकार, आर्यसमाज प्रतिनिधी अर्जुनराव सोमवंशी व इतर नामवंत मान्यवर उपस्थितीत होते.

या कार्यक्रमास फ्रेसबुक लाईव्ह उपस्थिती पण होती ज्यात प्रामुख्याने मसाप अध्यक्ष रामभाऊ तिरुके,काँग्रेसनेते व विचारवंत प्रा. डॉ. यशपाल भिंगे, धनंजय गुडसूरकर कर, अनिता येलमटे मॅडम,बारामतीचे प्रा. रविंद्र टिळेकर, चंद्रपूरच्या निर्मला देशकर मॅडम, अशा नामवंत विचारवंताचा ऑनलाईन सहभाग होता. सर्वांनी छोट्या शौर्यचे कौतूक व अभिनंदन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी संयोजक अनंत कदम, प्रा.राजपाल पाटील, आनंद बिरादार, हणमंत म्हेत्रे, सुरेश वजनम आदींनी परिश्रम घेतले.

०००० 

## तालूका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय

(दंडणिय विभाग )

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि दि. १५/०३/२०२४

जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार शेख पाशा चॉंदसाब रा.पानचक्की गल्ली उदगीर ता. उदगीर यांचा जन्म दिनांक २८/०४/१९७१ रोजी मौजे उदगीर ता. उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार शेख पाशा चॉंदसाब रा.पानचक्की गल्ली उदगीर ता.उदगीर यांनी त्यांचा जन्म दिनांक २८/०४/१९७१ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक १३/०३/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक २८/०४/१९७१ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार नामे शेख पाशा चॉंदसाब रा. पानचक्की गल्ली उदगीर ता. उदगीर यांचा जन्म दिनांक २८/०४/१९७१ रोजीची नोंद मुख्याधिकारी, नगर परिषद उदगीर ता. उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक १५/०३/२०२४ रोजी दिले

पूढे नेमलेली तारीख १६/०४/२०२४

तालूका दंडाधिकारी तथा
तहसीलदार उदगीर

## जाहीर प्रकटन

सर्व जनतेस कळविण्यात येते कि, उदगीर येथील सर्वे नं. २/१ मधील मी नासिया बेगम माझे अपत्य अनुक्रमे २ मुले व ५ मुली यांना वारसा हक्काद्वारे २० गुंठे जागा प्राप्त झाली आहे. सदर जागेबाबत माझे व माझ्या कुटुंबियांमार्फत हे जाहीर प्रकटन देत आहे. सदरची २० गुंठे जागाही सार्वजनिक धार्मिक प्रयोजनाकरिता किंवा दफ्फनभूमी करिता दान करण्यात आलेली नाही. सदरच्या जागेत कोणीही दफ्फन करू नये किंवा सदरच्या जागेचा वापर दफनभूमी म्हणून करू नये. सदर जागेत दफ्फन केल्याचे आढळून आल्यास पोलीस कार्यवाही करण्यात येईल. सदरच्या जागेच्या मालकी हक्काबाबत कोणत्याही न्यायालयात अथवा न्यायाधिकरणात वाद सुरु नाहीत.

त्यामुळे कोणीही समाज माध्यामातून (Social Media) खोट्या बातम्या पसरवित असल्यास पोलीस कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

नासिया बेगम
ह.मु.रहमतनगर नांदेड

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.एन.जे.चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३४७/२०२४ निशाणी क्र.०७

ज्याअर्थी नामे Annarao s/o Veynkoba Biradar हे दिनांक ०४/०९/२०२३ रोजी At. Loni, Udgir Tq. Udgir Dist Latur येथे मयत झाले आहेत. व अर्जदार

1) Gangasagar w/o Annarao Biradar Age, 64. OccuHH
2) Govind s/o Annarao Biradar. Age, 39, Occu Agri.
3) Bhagvan s/o Annarao Biradar. Age, 40. Occu- Agri. R/o Loni, tq, Udgir, Dist, Latur

यांनी खालील नमुद हे मयताचे वारसदार असुन,

| Sr.no | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 01 | Gangasagar w/o Annarao Biradar | 64 | Wife |
| 02 | Govind s/o Annarao Biradar | 39 | Son |
| 03 | Bhagvan s/o Annarao Biradar | 40 | Son |

अर्जदार याने Annarao s/o Veynkoba Biradar या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहु वारसदार सदरहु मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु Annarao s/o Veynkoba Biradar यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९/०५/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख २७/०६/२०२४

(डी.ए.कांबळे)
कनिष्ठ लिपीक
३ रे सहदिवाणी न्यायालय,
क.स्तर उदगीर

(एस.एम.शेटे)
सहायक अधिक्षक
सहदिवाणी न्यायालय,
क.स्तर उदगीर

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.बी.आर.झेंडे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३५५/२०२४ निशाणी क्र.०७

ज्याअर्थी नामे Dwarkabal w/o Nagnath Debedwar हे दि. २८/१०/२०२३ रोजी At pune, येथे मयत झाले आहेत. व अर्जदार

1) Lata w/o Sanjay Rudrawar Age, 49. OccuH.H
All R/o Kolnoor, Tq Jalkot. Dist, Latur

यांनी खालील नमुद व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असुन,

| Sr. no | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 01 | Lata w/o Sanjay Rudrawar | 49 | Daughter |
| 02 | Suman w/o Ramrao Rudrawar | 61 | Daughter |
| 03 | Mangal w/o Prakash sant | 71 | Daughter |
| 04 | Nirmala w/o suryakant Somawar | 71 | Daughter |
| 05 | Vanita w/o Dattatraya | 60 | Daughter |

अर्जदार याने Dwarkabal w/o Nagnath Debedwar या मयताचे वारसाचे प्रमापत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्याअर्थी सदरहु वारसदार सदरहु मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु Dwarkabal w/o Nagnath Debedwar यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३/०५/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख २९/०६/२०२४

(डी.ए.कांबळे)
कनिष्ठ लिपीक
३ रे सहदिवाणी न्यायालय,
क.स्तर उदगीर

(एस.एम.शेटे)
सहायक अधिक्षक
सहदिवाणी न्यायालय,
क.स्तर उदगीर

## तालूका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय

(दंडणिय विभाग )

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि दि. १६/०५/२०२४

जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार संतोष एकनाथ तलवारे रा. कुमठा खुर्द ता. उदगीर त्यांचे वडील नामे एकनाथ गंगाराम तलवारे यांचा मृत्यु दिनांक ०२/०३/१९९० रोजी मौजे कुमठा खुर्द ता. उदगीर येथे झाला असून मृत्यु नोंदवहीला त्यांची मृत्यु नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार संतोष एकनाथ तलवारे रा. कुमठा खुर्द त्यांचे वडील नामे एकनाथ गंगाराम तलवारे यांचा मृत्यु दि. ०२/०३/१९९० रोजीची नोंद मृत्युनोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दि.१५/०५//२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचे वडील मृत्यु दिनांक ०२/०३/१९९० रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार संतोष एकनाथ तलवारे रा. कुमठा खुर्द त्यांचे वडील त्यांचे वडील नामे एकनाथ गंगाराम तलवारे यांचा मृत्यु दिनांक ०२/०३/१९९० रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय कुमठां खुर्द ता. उदगीर येथे करण्यात येईल.

आज दिनांक १६/०५/२०२४ रोजी दिले

पूढे नेमलेली तारीख १७/६/२०२४

तालूका दंडाधिकारी तथा
तहसीलदार उदगीर

## तालूका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय

(दंडणिय विभाग )

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि दि. १६/०५/२०२४

जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार सुधीर दादाराव झोले रा. हंडरगुळी ता. उदगीर त्यांचे वडील नामे दादाराव गोविंद झोले मृत्यु दिनांक २२/०७/१९९८ रोजी मौजे हंडरगुळी ता. उदगीर येथे झाला असून मृत्यु नोंदवहीला त्यांची मृत्यु नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार सुधीर दादाराव झोले रा. हंडरगुळी त्यांचे वडील नामे दादाराव गोविंद झोले मृत्यु दिनांक २२/०७/१९९८ रोजीची नोंद मृत्युनोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक-१३/०५/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचे वडील मृत्यु दिनांक २२/०७/१९९८ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार सुधीर दादाराव झोले रा. हंडरगुळी त्यांचे वडील नामे दादाराव गोविंद झोले मृत्यु दिनांक २२/०७/१९९८ मृत्यु दिनांक २२/०७/१९९८ रोजीची नोंद मुख्याधिकारी, नगर -परिषद उदगीर ता उदगीर येथे करण्यात येईल.

आज दिनांक १६/०५/२०२४ रोजी दिले

पूढे नेमलेली तारीख १७/६/२०२४

तालूका दंडाधिकारी तथा
तहसीलदार उदगीर





उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०

दररोज ४ शो




उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया | | |

मराठवाड्यात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स


| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड) डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार ४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ
डॉ.अंकिता लाहोटी (DOMS)
डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.)
डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष
व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर
लॉ. प्रदिप बेद्रे सचिव





# नागरी बँक असोसिएशनची नवीन इमारत उभारणार : प्रकाश वाले

## वीरशैव व्हिजन तर्फे प्रकाश वाले यांचा सत्कार

सोलापूर(प्रतिनीधी): सोलापूर नागरी बँक असोसिएशनची नवी इमारत उभी करणार आहे. त्यामध्ये आरबीआयचे नवीन नियम, धोरणे याविषयी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. बँकिंग क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान अवगत करून देण्यात येणार आहे. कर्जवसुली बाबत सहकार खात्याचे एक न्यायालय असणार आहे. कर्जदारांनी त्यांचे कर्ज नियमित फेडले पाहिजेत असे प्रतिपादन सोलापूर जिल्हा नागरी बँक असोसिएशनचे नुतन चेअरमन प्रकाश वाले यांनी केले.

श्री सिद्धेश्र्वर सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रकाश वाले यांची सोलापूर नागरी बँक असोसिएशनच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल वीरशैव व्हिजनतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी वीरशैव व्हिजनचे सचिव नागेश बडदाळ यांच्या हस्ते श्री वाले यांचा फेटा, शाल व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी वीरशैव व्हिजनचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले, कोषाध्यक्ष आनंद दुलंगे, सहकार्याध्यक्ष राजेश निला, श्रीमंत मेरू, अविनाश हत्तरकी, सोमनाथ चौधरी, सिद्धेश्र्वर कोरे, बद्रीनाथ कोडगी-स्वामी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजशेखर बुरकुले यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन राजेश नीला यांनी केले.

# देगलूर महाविद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली

देगलूर(प्रतिनीधी): येथील अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागातील सर्व शाखेचा इयत्ता बारावी वर्गाचा निकाल आज जाहिर झाला.

लातुर विभागीय शिक्षण मंडळ इयत्ता बारावी कला ,वाणिज्य, विज्ञान व व्यावसायिक अभ्यासक्रमाची परिक्षा फेब्रुवारी -मार्च २४ मधे घेण्यात आली होती.

या परिक्षेचा निकाल लातूर विभागीय शिक्षण मंडळाने दि २१मे रोजी ऑनलाईन जाहिर केला आहे. या मधे महाविद्यालयातील कला शाखेचा ७८.३६%वाणिज्य शाखेचा ९६.०७%तर सर्वाधिक विज्ञानशाखेचा.९६.८८.% लागला आहे.

इ १२वीबोर्ड परीक्षेसाठी एकूण ७२२विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली यामधे एकूण६६७विद्यार्थी उतीर्ण झाले. विज्ञानशाखेची कु.समिक्षा बिरादार हिला८५.८३%,कु. जिरगे अंकिता ८५.८३%,कु दिक्षित मधुरा गिरीश ८४%,ओम नल्लावार८३.८३% , कला शाखेत चेंडके मनोज ८३%,कु.चिंचोले पुजा माधव ८१.१७% ,संकेत निलमवार ८०.८३%, वाणिज्य शाखेत कु.कुलकर्णी रूद्राणी श्रीपाद ९५.६७% कु. सातेलीवार सुरभी ९४%,कु.उदगीरे दर्शना९१.३३% गुण प्राप्त केले. ५७विद्यार्थी विशेष प्राविण्य; प्रथम श्रेणीत २८४ तर द्वितीय श्रेणीत २९३;विद्यार्थी उतीर्ण झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे अ.व्या.शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर सचिव शशिकांत चिद्रावार,उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्षविलासशेठतोटावार ,कार्यकारिणी सदस्य राजकुमार महाजन ,देवेंद्र मोतेवार, गंगाधरराव जोशी;रविंद्र अप्पा द्याडे,जनार्दन चिद्रावार, डॉ कर्मवीर उन्नग्रतवार ,चद्रकांत नारलावार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ ऊपप्राचार्य डॉ अनिल चिद्रावार;अधीक्षक गोविंद जोशी,उपप्राचार्य प्रा.उत्तम कुमार काबंळे पर्यवेक्षक संग्राम पाटील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# एन सी सी वार्षिक प्रशिक्षण शिबीरात कॅडेटसना दिली सर्पाची माहिती आणि गोळीबार सराव



लातूर / प्रतिनिधी- ५३ महाराष्ट्र बटालियन राष्ट्रीय छात्र सेना यांच्या अधिपत्याखाली सुरु असलेल्या वार्षिक प्रशिक्षण शिबीरात विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण यांच्या सहाय्याने सर्पमित्र राहुल कांबळे यांनी कॅडेट्सना सर्पाचे प्रकार, सर्प दंश झाल्यास प्रथम उपचार, प्रात्याशिक करून माहिती दिली. खंडापूर येथील मुलींचे वस्तीगृह येथे हे शिबीर होत आहे.

याप्रसंगी कमान अधिकारी तथा कैम्प कमांडट, लेफ्टनंट कर्नल हेमंत जोशी, कर्नल वाय. बी. सिंह, प्रशासकिय अधिकारी तथा डेपुटी कैम्प कमांडट, कॅम्प मधील ४५० कॅडेटस शाळा व महाविद्यालय नियुक्त एन.सी. सी. अधिकारी भारतीय सैन्य दलातील प्रशिक्षक अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

या प्रशिक्षणादरम्यान ०.२२ रायफलची ४५० कॅडेट्सचा गोळीबार सराव हा बीएसएफ ट्रेनिंग सेंटर येथे डेपुटी कैम्प कमांडट लेफ्टनंट कर्नल बाय. थी. सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेल्या एकूण चार तुकड्यांमध्ये लातूर व धाराशिव जिल्ह्यातील ४५० एन.सी.सी. कैडेट्स मुला मुलींनी गोळीबार सराव केला. कॅम्पच्या यशस्वीतेसाठी कमान अधिकारी कर्नल हेमंत जोशी व प्रशासकिय अधिकारी वाय. बी. सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली सुबेदार मेजर शंभू सिंग, सुभेदार शेखर थोरात, सुभेदार शेख पाशा, सुभेदार उत्तम पाटील, सुभेदार हरिंदर सिंग, नायब सुभेदार बाजीराव पाटील, लेफ्टनंट अतिश तिडके, लेफ्टनंट गुणवंत ताटे, थर्ड ऑफिसर सिद्दिकी जे. के., मकरंद पाटील, बी.एच.एम. योगेश बारसे, हवालदार अजमेर सिंग, बी. व्ही. घोगरे, आर. आर. पवार तसेच प्रशिक्षक स्टाफ हे कॅम्पच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत.

# खरीप - २०२४ हंगामासाठी जिल्हा आणि प्रत्येक तालुकास्तरावर तक्रार निवारण कक्ष कार्यान्वित

लातूर, / प्रतिनिधी- खरीप-२०२४ हंगामात लातूर जिल्ह्यातील कृषि निविष्ठा केंद्रांवरून बियाणे, खते, कीटकनाशके आदी कृषि निविष्ठा खरेदी करतांना गुणवत्ता व दर्जा बाबत शेतकऱ्यांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी जिल्हा स्तरावर, तसेच प्रत्येक तालुकास्तरावर एक १० असे एकूण ११ तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी आर. टी. जाधव व जिल्हा परिषदेचे कृषि विकास अधिकारी सुभाष चोले यांनी दिली.

खरीप-२०२४ हंगामामध्ये शेतकऱ्यांना आवश्यक त्या प्रमाणात आणि गुणात्मक दर्जाच्या कृषि निविष्ठा एमआरपी दराने उपलब्ध होण्यासाठी आणि शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी कृषि विभागातील गुणनियंत्रण निरीक्षकांमार्फत नियमित कृषि निविष्ठा विक्री केंद्रांची आणि कृषि निविष्ठांची तपासणी करण्यात येते.

यानंतरही शेतकऱ्यांना कृषि निविष्ठा विक्री केंद्रावरून कृषि निविष्ठांची खरेदी करताना काही अडचण अथवा खरेदी पश्चात खरीप हंगाम संपेपर्यंत कृषी निविष्ठांचा दर्जा व गुणवत्ता आदीबाबतीत संशय आल्यास अथवा त्यामध्ये आपली फसवणूक झाली, असे निदर्शनास आल्यास शेतकऱ्यांच्या तक्रारीचे वेळीच निवारण करण्यासाठी जिल्हास्तरावर एक व दहा तालुक्यात प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण ११ तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

संबंधित तालुक्यातील शेतकरी कृषि निविष्ठाबाबतची तक्रार नोंदवितांना संबंधित गुणनियंत्रण निरीक्षकांकडे, तक्रार निवारण कक्ष प्रमुखाकडे लेखी तक्रार अर्जासोबत कृषि निविष्ठांच्या खरेदीची पावती, सातबारा, होल्डींग आदी कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी तक्रार अर्जावर आपला संपूर्ण पत्ता, गांव, तालुका व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदवावा. या व्यतिरिक्त शेतकरी आपली तक्रार संबंधित तालुक्याच्या तालुका कृषि अधिकारी किंवा कृषि अधिकारी पंचायत समिती यांच्या कार्यालयात नोंदवावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी आर. टी. जाधव व जिल्हा परिषदेचे कृषि विकास अधिकारी सुभाष चोले यांनी केले आहे. कृषि निविष्ठा खरेदी करताना शेतकऱ्यांनी घ्यावयाची काळजी गुणवत्ता व दर्जेदार निविष्ठा मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी अधिकृत विक्रेत्याकडूनच निविष्ठा खरेदी कराव्यात. निविष्ठा खरेदी करताना विक्रेत्याकडून पक्की पावती ज्यामध्ये बियाणांची जात, लॉट नंबर, उत्पादक दिनांक इत्यादी मजकूर असल्याची खात्री करावी. नोंदणीकृत निविष्ठाची व लेबल क्लेम असलेल्या निविष्ठांचीच खरेदी करावी. तसेच खताच्या किंमतीत सद्यस्थितीत कोणत्याही प्रकरची वाढ झालेली नसून चढ्या भावाने कृषि निविष्ठांची विक्रेत्यांवर विक्री केल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. बियाणे, खते व कीटकनाशक यांच्या गुणवत्ता व पुरवठ्याच्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणीचे निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. सकाळी ८ ते सायंकाळी ८ या वेळेत संपर्क साधण्यासाठी भ्रमणध्वनी क्र.९४०४५०५६२० असा आहे. तसेच ८७८८०९१४०१ / ७५८८१७८७८७ या क्रमांकावर व्हाट्सअपद्वारे तक्रार नोंदविता येईल. तसेच dsaolaturrediffmail.com / adolaturgmail.com या ई-मेल आयडी वर सुध्दा तक्रार मेलव्दारे पाठवता येईल, असे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. जाधव यांनी कळविले आहे.


## टी.सी हरवली आहे

माझी ऋषिकेश मारोती वळगे या नावाची १० वी पासची मुळ टि.सी बसस्टँड ते पोलिस स्टेशन, उदगीर प्रवासादरम्यान दि. ०३/०५/२०२४ रोजी हरवली आहे.

जर कोणास सापडली असल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

संपर्क :

मो.नं. ८७६७४२७९८२



## जाहीरनामा

दिवाणी न्यायाधीश क. स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ७२ / २०२४ निशाणी क्र.

अर्जदार जोतीराम पि. पांडूरंग कदम ज्यापेक्षा वडील नामे पांडूरंग धोंडीबा कदम है दिनाक १९/१०/२०२३ रोजी मौजे सय्यदपूर ता. देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. त्यांचे वारसदार खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| ०१ | जोतीराम पि. पांडूरंग कदम | ३५ | मुलगा |

यांनी या कोर्टात सदरहू मयताच Heirship certificate/वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरून असे कळविण्यांत येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयाताचे Heirship certificate/वारस प्रमाणपत्र देईल. सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १५/०५/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे. पुढील नेमलेली तारीख :- २५/०६/२०२४.

(आर.टी.शिंदे) (आर.एस.वाघमारे)
व.लिपीक प्र.सहायक अधिक्षक



## जाहीर प्रकटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की, मौ. उदगीर येथील जमीन सर्वे नं १२ मधील प्लॉट नं ०७ पैकी ज्याचा न. प.नं २-२-८९५/१ एकुण क्षेत्र ६५.०५ चौ.मी. ज्याची चतुर्सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस - राहुल नायकवाडे यांचा प्लॉट नं ०८ पैकी भाग

पश्चिमेस - पानचावरे यांची जागा

दक्षिणेस - देगलूर रोड

उत्तरेस - सयद मूस्तफ्फा सयद मिर यांचा प्लॉट नं २२

वरील चतुर्सिमेच्या आतील प्लॉट राजगोपाल पि. ओमप्रकाश मनियार रा. धायरिगाव ता. हवेली जि पुणे यांच्या मालकी व ताब्यातील असून त्यांनी सदर प्लॉट संगमेश विश्वनाथ गांजरे रा. उदगीर जि लातूर यांना कायमचा विकीठराव केलेला आहे.

सदर जमीनीबाबत / प्लॉट बाबत इतर कोणाचेही त्यांचे हक्क वारसा हक्क गहाणखत ठरावपत्र व कोर्टात प्रकरण प्रलंबीत आहे, असे काही सांगावयाचे असेल तर १५ दिवसाच्या आत त्यांच्या हरकती / तकार खालील दिलेल्या पत्त्यावर/दूरध्वनी कमांकावर १५ दिवसांच्या आत मुदतीत कळवावे त्यानंतर कोणाचेही, कुठलेही उजर/तकार विचारात घेतली जाणार नाही व खरेदीखत करण्यात येत आहे.

सबब हे जाहीर प्रगटण आपल्या हितचिंतक / हितावह देण्यात येत आहे याची नोंद घ्यावी.

दिनांक २२/०५/२०२४

जाहिर प्रगटण देणार

संगमेश विश्वनाथ गांजरे

रा. उदगीर ता उदगीर जि लातूर

मो. ९८९०४०३१२३, ९१७५०६२१११

तर्फे,

ॲड. डी.ए. साबणे, उदगीर


# महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाने राखली उज्वल यशाची परंपरा

लातूर- श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्र्वर कनिष्ठ महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान आणि व्यवसाय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. या सर्व गुणवान आणि गुणवंत विद्यार्थी आणि पालकांचा स्मृति चिन्ह पुष्पहार आणि पेढे देवून संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर आणि कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, विज्ञान शाखेचे समन्वयक प्रा. वनिता पाटील, प्रा. नितीन वाणी, कला शाखेचे समन्वयक प्रा. रवींद्र सोनोने, प्रा. विश्र्वनाथ स्वामी, वाणिज्य शाखेचे समन्वयक प्रा. कल्पना गिराम, डॉ. घनश्याम ताडेवार, व्होकेशनल शाखेचे समन्वयक प्रा. व्यंकट दुडीले आणि स्टाफ सचिव प्रा. रवींद्र सुरवसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावर्षी विज्ञान शाखेत एकूण ४३४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली त्यापैकी ४०३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाखेचा निकाल ९२.८५ टक्के आहे. या शाखेतून कु. शिंदे शुभांगी बालाजी ८६.८३ टक्के घेऊन महाविद्यालयात सर्वप्रथम, कु. पांचाळ सायली बालाजी ८५.८३ टक्के द्वितीय आणि राजगीरवाड कृष्णा शिवाजी ८२.८३ टक्के गुण घेऊन सर्व तृतीय आला आहे. १५ विद्यार्थी ७५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले असून ६८ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहे.

वाणिज्य शाखेत २६७ परीक्षार्थीपैकी २४१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेचा निकाल ९०.२६ टक्के आहे. या शाखेत २६७ परीक्षार्थी पैकी २४१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाखेचा निकाल ९०.२६ टक्के आहे. मागील वर्षीच्या तुलनेत ५ टक्के अधिक आहे. कु. बैले ज्ञानेश्र्वरी केशवराव ९०.३३ टक्के गुण प्राप्त करून सर्वप्रथम, पांचाळ प्रणव गोपीनाथ ८५.१७ टक्के गुण प्राप्त करून सर्व द्वितीय आणि बादाडे अतुल तानाजी ८४.५० टक्के गुण प्राप्त करून सर्व तृतीय आला आहे.

कला शाखेत १७० परीक्षार्थीपैकी ११९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेचा निकाल ७० टक्के आहे. कला शाखेत परीक्षेला बसलेल्या १७० विद्यार्थ्यांपैकी ११९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यापैकी ७५ टक्के गुण घेणारे ०७ विद्यार्थी, ६० टक्के गुण घेणारे २१ विद्यार्थी आहेत. कु. शिंदे रूपाली प्रवीण ८७.५० टक्के गुण घेऊन सर्वप्रथम, कु. बनसोडे श्रेया नागसेन ७८.३३ टक्के गुण प्राप्त करून सर्व द्वितीय आणि ७६.८३ टक्के गुण प्राप्त करून तृतीय आली आहे.

एच. एस. सी. व्होकेशनल शाखेत ६७ पैकी ५४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या शाखेचा निकाल ८०.५९ टक्के आहे. या शाखेतून सय्यद हुजॅफा हसन ७३.५० टक्के गुण घेऊन प्रथम, बुधावळे जगदीश संजय ७१.५० टक्के गुण घेऊन द्वितीय आणि ढोबळे अनिकेत लालाजी ६८.८३ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे.

या महाविद्यालयामधून कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतून १०० पैकी १०० गुण घेणारे पाली विषयाचे ०४, दुग्धशास्त्र विषयात २०० पैकी २०० गुण घेणारा ०१, हिंदी विषयात ९० पेक्षा जास्त गुण घेणारे ०५ विद्यार्थी, भौतिकशास्त्र विषयात ८५ पेक्षा जास्त गुण घेणारे ०२, अर्थशास्त्र विषयात ९० पेक्षा जास्त गुण घेणारे ०२, भूगोल विषयात ९० पेक्षा जास्त गुण घेणारे ०२ विद्यार्थी आहेत.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे यांनी केले.

मनोगतपर मार्गदर्शन संस्थेचे कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, महात्मा बसवेश्र्वरांच्या वचनाला अनुसरून देशीकेंद्र महाराजांनी श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. आज अनुभव मंडपाच्या माध्यमातून महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातून गुणवान आणि गुणवंत विद्यार्थी निर्माण होत आहे याचा मनस्वी आनंद झाला आहे.


## दक्षिण मध्य रेल्वे

आम्हाला @scr.Railwayindia यावर अनुसरण करा

दक्षिण मध्य रेल्वेच्या सविस्तर माहितीसाठी आपण

WWW.SCR.Railwayindians.gov.in या संकेतस्थळावर पाहू शकता

**खुली ई-टेंडर नोटीस नं सी/ई२९/इलेक्ट/एम/एससी/०४/ओटी/२०२४-२५**
**दिनांक:२१.०५.२०२४**

PUB/0478

भारताचे राष्ट्रपती व त्यांचे वतीने त्यांच्या स्वाक्षरीने खालील कामे करण्यासाठी दि. ०५.०६.२०२४ रोजी १५.०० वाजेपर्यंत ई-निविदा मागविण्यात येत आहे.

**१.ई-टेंडर नं: इटेंडर नं.सी/ई.२९/इलेक्ट/एम/एससी/०४/ओटी/२०२४-२५**

टेंडर नं. ई-एम-एससी-ओटी-२०२४-२५

**कामाचे नाव:** सिकंद्राबाद डिवीजन- विद्युत देखभाल विभाग-१.७८२ मेगावॅट सौर प्लॅन्ट (छतावरील). स्टेशन इमारतींची क्षमता, सेवा इमारती, निवासी इमारती, आणि एससी विभागातील एलसी गेट्स इत्यादींची तरतूद करणे- विद्युत व्यवस्था.

**निविदेची किंमत:** (रु) १४१६९६४५४.१५

**इसार रक्कम:** (रु) ८५८५००.००

**सीटीएफ:** (रु) नील

**पुर्णत्वाचा कालावधी:** ६ महिने

**सिनी. डिवीजनल इलेक्ट्रिकल इंजिनियर (एम)/**
**ए ०६०७ सिकंद्राबाद**

निविदा च्या पुढील अटी व आधिक माहितीसाठी (निविदाकागदपत्रात उपलब्ध)आणि कागदपत्र डाउनलोड करणेसाठी आमची वेबसाईटला https://www.ireps.gov.in or www.scr.indianrailways.gov.in भेट द्या



## जाहीरनामा

**श्री. पी. टी. गोटे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, लातूर यांचे न्यायालयात**

कोर्टाचा शिक्का

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ९१५/२०२४**
**रमेश वि. निरंक, निशाणी क्र. ६**
**वारसाचे प्रमाणपत्र मिळेणबाबत**

ज्यापेक्षा मयत १. प्रभुराव ऊर्फ प्रभाकर ऊर्फ प्रभु ज्योतीबा भोसले दिनांक २२.०६.१९९१ व २. सुलोचना प्रभु भोसले दिनांक १६.१०.२०२१ रोजी लातूर येथे मयत झाले असून अर्जदार, १. रमेश पि. प्रभु भोसले, वय ६१, धंदा-वैद्यकीय व्यवसाय व शेती, रा. गुळ मार्केट, कव्हा रोड, लातूर, ता. जि. लातूर..... अर्जदार यांनी सदरहू मयताचे मृत्युपश्चात शासकीय व निमशासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयासमोर अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार हे सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास त्याला सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देईल.

आज तारीख १९.०७.२०२४

पु.ने.ता. २०.०६.२०२४

**आदेशावरून**

**क लिपीक** **जयंत मुरलीधरराव धर्माधिकारी**
**२रे सह दिवाणी** **अधिक्षक दिवाणी न्यायालय,**
**न्यायालय, व. स्तर, लातूर** **व स्तर, लातूर**



## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.

संपर्क 99 93 94 16 69 / 98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ४-७ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ०-४ | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26



# यशवंत

गुरूवार दिनांक २३ मे २०२४

उदगीर

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# ईश्वराचा प्रसाद म्हणुन उपभोग घेतल्यास संसारातुन मुक्ती - जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी



उदगीर (प्रतिनिधी) : ईश्वरानेमानवालासुखभोगण्यासाठी सर्व काही दिले आहे परंतू भोगणारे आपणच आहोत.

माझं म्हणून न भोगता देवाचा प्रसाद म्हणून भोगलो तर संसारातुन मुक्त होतो असे मोल्लिक विचार काशीपीठाचे जगदगुरु डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी व्यक्त केले.

उदगीरचे आराध्य देवत सदगूरु श्री हावगीस्वामी मंदिरचा जिर्णोध्दार व मंदिराचा सुवर्ण कलशारोहण सोहळा निमित्य श्री गुरु हावगी स्वामी मठाचे मठाधिश शिवाचार्यरत्न ष.ब्र.१०८ डॉ. शंभूलिंग शिवाचार्य महाराज यांच्या नेतृत्वाखाली श्री गुरु हावगी स्वामी महाराज शेतमळा बिदर गेट येथील भव्य जागूत विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. कार्यक्रमाचा काशीपीठाचे जगदगुरु डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत उपदेशाने झाला.

यावेळी व्यासपीठावर डॉ.शंभूलिंग शिवाचार्य, महादेव शिवाचार्य महाराज वाईकर, शंभुलिंग शिवाचार्य महाराज अंबाजोगाई, सिध्दलिंग महास्वामी देवणी, म.नि.प्र.शिवानंद महास्वामी सायगावकर, सिध्दओमकार शिवाचार्य जंगमवाडी,मुरुगेंद्र स्वामी आदी उपस्थित होते.

## डॉ.शंभुलिंग शिवाचार्य महाराजांचा काशिपीठाच्या वतीने गौरव

**श्रीगुरू हावगीस्वामी मठाचे कार्यक्षेत्र असलेल्या तीन राज्याच्या सिमेवरील उदयगिरीच्या पावनभुमीत श्रीगुरू हावगीस्वामी मठाचे मठाधिश डॉ.शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांनी श्रीगुरू हावगी स्वामी मंदिरावर सुवर्णकलश सोहळा अभुतपुर्व यशस्वीरित्या आयोजित केल्याबध्दल काशिपिठाच्या वतीने जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्याहस्ते डॉ.शंभुलिंग शिवाचार्य महारांचा काशिपीठाच्या वतीने शाल पांघरून गौरव केला व आर्शिवाद दिला.**

शिवाचार्य गण सह ना.संजय बनसोडे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, ॲड गुलाब पटवारी, बाधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मुकदम, आदी उपस्थित होते.

प्रारंभी सुवर्णकळस सोहळा यशस्वी करण्यासाठी योगदान देणाऱ्या शिव किर्तनकार, प्रवचन कार, भजनी मंडळ, पौरहित्य मंडळ,महिला भजनी मंडळ आर्दीचा मंदिर समितीच्यावतीने जगदगुरुंच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रारंभी डॉ शंभुलिंग शिवाचार्य महाराजानी श्री गुरु हावगीस्वामी मंदिर सुवर्ण कळसारोहण सोहळा यशस्वी करणारे शिवाचार्य, शिवकिर्तणकार मंडळ, प्रवचनकार, महालि भजनी मंडळ,हावगुस्वामी युवक मंडळ या सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

समारोपाचे अन्नदाते निलेश बालाजीराव पाटिल व सौ.श्रध्दा पाटिल परावारांचा जगदगुरुंच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी अमृतउपदेश करताना जगदगुरु डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी म्हणाले की,माझ माझ म्हणणे ही भ्रामंती आहे सृष्टी ही ईश्वराची आहे सर्व काही ईश्वराचेच आहे म्हणून उपभोग घेतला तर प्रसाद होतो व माझ म्हणून उपभोग घेतल्यास तो पदार्थ होतो. वीरशैवांची ईष्ठलिंग भक्ती सर्वश्रेष्ठ आहेभक्तीमध्ये वीरशैवाएवढे कुणी मोठे नाही लिंगपुजा परंपरा ही युगान युगे चालत आलेली परंपरा आहे सर्व देवी देवतानी ते मस्तकावर धारण केला होता तर मानव ईष्टलिंग गळ्यात धारण करतो .मानवास सर्व रुणातून मुक्त होता येईल परंतून गूरु रुणातून मुक्त होता येत नाही तरीही प्रसन्न मनाने गुरुला सढळ हाताने दान करावे . जसे नदीतले जल औंजळीत घेऊन नंदीत अर्पण केले जाते तसेच गुरु शिष्याकडून घेतलेले परत विविध स्वरुपात दिले जाते .असे सांगून श्री गुरु हावगीस्वामी मठाचे मठाधिश डॉ. शंभूलिंग शिवाचार्य यांच्या नेतृत्वाखाली मठाची प्रगती उल्लेखनिय असुन त्यांच्या नेतृत्वाखाली श्री गुरु हावगीस्वामी मठाच्या वैभवात उत्तरोत्तर वाढ होईल असा आशिर्वाद देऊन जगदगुरु म्हणाले की, राष्ट्र संत डॉ.शिवलिंगशिवाचार्यमहाराजांनी महाराष्ट्रात वीरशैव लिंगायताच्या जागृतीसाठी केलेल्या कार्य मोठे आहे .त्याच्या नंतर महाराष्ट्र राष्ट्रात सुरु केलेली परंपरा यापुढिल काळात सुरु ठेवतील असे सांगून महाराष्ट्रात सर्वच शिवाचार्यांचे योगदान महत्वपुर्ण असल्याचे सांगीतले. तसेच विरभद्र स्वामी यांच्या नेतृत्वाखाली वैदिक पौरहित्य मंडळ, हावगीस्वामी युवक मंडळाचे ईश्वर समगे, सगंम समगे,डॉ.रवी मुळे,माधव समगे,पिंट्टु समगे, आकाश समगे, मोहित आष्टुरे,महेश समगे, आदित्य समगे,सोमनाथ मुळे, योगेश समगे, बबलु मुळे, कल्याण कपाळी, रोहित स्वामी,नसप्पा खंदारे,नागेश आठाणे,हावगीप्रसाद स्वामी, सुरेश आठाणे,रामेश्वर खंदारे,अभिषेक समगे,सुमित आष्टुरे ,सुनिल उप्परबावडे,शेखर कानमंदे, मनोज उप्परबावडे,रतिष उप्परबावडे, सतिष उप्परबावडे ,,संदिप उप्परबावडे,सोपनिल खंदारे, रमेश अंजुरे, प्रशांत स्वामी,औम उप्परबावडे.श्रीागुरु हावगीस्वामी महिला मंडळाचे श्रीमती लक्ष्मि बाई पांढरे, माजी नगरसेविका श्रीमती रेखाताई कानमंदे,शंकुंतला समगे, श्रीदेवी खंदारे, सुनिता मठपती,ज्योती समगे, प्रेमला समगे, ताराबाई मोदी,सविता समगे, सुरेखा समगे, कलावती आठाणे, कल्पना कानमंदे, सुरेखा मोदे,प्रेमला खंदारे, शिवमाला समगे, जगदेवी स्वामी, रेष्मा कापसे, कस्तुरा समगे,सुभद्रा कुंभार, शरणम्मा डाबरगिते, चंद्रकला करंजे, सुनंदा हळ्ळे, पुष्पा द्याडे, छबू द्याडे, अनिता नुत्ते, सुशिला हुडगे, सुनिता डोणगाव, लक्ष्मिबाई स्वामी , महादेवी गौरशेट्टे,विद्यावती कानमंदे, चन्नमा बिरादार, राजेश्री उप्परबावडे, रेवम्मा उप्परबावडे, बालिका कानमंदे,शोभा चपाते, संगीता गौरशेट्टे,रेखा पटणे,मिना कानमंदे , गितकार हावगी पन्नासे औंकारेश्वर भजनी मंडळ, शिवशक्ती भजनी मंडळ, नवशा महादेव भजनी मंडळ,सिध्दरामेश्वर भजनी मंडळ, शिवलिंग पाटिल आर्दीनी परिश्रम घेतले.

या समारोप कार्यक्रमाचे प्रास्ताविकशि.भ.प.उध्दवमहाराज हैबतपुरे,शि.भ.प. शिवराज नावंदे गुरुजी यांनी केले.

तर संचलन वआभार विरभद्र स्वामी यांनी केले.

००००

# १२ वी बोर्ड परिक्षेत श्री गुरुदत्त विद्यालयाचे घवघवीत यश

जळकोट/माधव होनराव : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ लातूरच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत जळकोट येथील श्री गुरुदत्त उच्च माध्यमिक विद्यालयाचा फेब्रु- मार्च- २०२४ चा निकाल उत्कृष्ट लागला असून विज्ञान शाखेत एकूण १७३ पैकी १७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून सरासरी निकाल १०० % लागला आहे. कला शाखेत एकूण ५३ पैकी ५२ विद्यार्थी उत्तीर्ण आले असून शेकडा निकाल ९८.१४ % लागला आहे.

विज्ञान शाखेत ९३. ६१% गुण प्राप्त करून कु. हराळे सानिका अनिल ही सर्वप्रथम, ९३.५० % गुण प्राप्त करून कांबळे हर्षद नवनाथ हा सर्वद्वित्तीय तर ८९.८८% गुण मिळवून कु, सोनटक्के सृष्टी परमेश्वर व कु.शेरखाने मानसी शामसुंदर या सर्वतृत्तीय आल्या आहेत. विज्ञान शाखेत ९० % पेक्षा जास्त गुण घेणारे ०३ विद्यार्थी, ८० % पेक्षा जास्त गुण घेणार ५२ विद्यार्थी व ७५ % पेक्षा जास्त गुण घेणारे ४७ विद्यार्थी उतीर्ण झाले आहेत.

कला शाखेत एकूण ७१.३३ % गुण घेवून कु.कांबळे मनिषा मल्हार सर्वप्रथम, ६९.००% गुण घेवून मुजावर वशिम मुनिर सर्वद्वित्तीय, तर ६८.८३ % गुण घेऊन कु.एकलारे श्रावणी शिवलिंग ही सर्वतृत्तीय क्रमांकाने पास झाले आहे.याउत्कृष्टनिकालाबद्दलयशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ.अशोक सांगवीकर, उपाध्यक्ष अनिल पाटील, सचिव मंगेश चंद्रशेखर पाटील, सहसचिव अण्णाराव पाटील, कोषाध्यक्ष तुळशिराम भोसले व संचालक घोटे श्रीराम, किशन जाजू, सुरेंद्र पाटील, बाळासाहेब पाटील, श्रीकांत पाटील, प्राचार्य दत्तात्रय हम्पल्ले, प्रा. शिवाजी धुळशेटे, प्रा.माधव मरशिवणे यांच्या सह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# शेळगाव मोफत सर्व रोगनिदान व औषधोपचार तथा नेत्ररोग-मोतीबिंदू व रक्त तपासणी शिबिराचे आयोजन

उदगीर(प्रतिनिधी) :- धन्वंतरी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँड चॅरिटेबल हॉस्पिटल, उदगीर यांच्या वतीने शाहू विद्यालय,शेळगावपाटी,ता.चाकूर येथे रविवार,दिनांक:-२६ मे २०२४ रोजी सकाळी ठीक ११.०० ते दु.०४.०० या दरम्यान मोफत सर्व रोगनिदान व औषधोपचार तथा नि:शुल्क मोती बिंदू व रक्त तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

सदरील शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळ,अहमदपूरचे अध्यक्ष तथा माजी मंत्री मा.श्री.बाळासाहेब जाधव,अहमदपूर-चाकूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय -कार्यसम्राट आमदार तथा सचिव मा.श्री.बाबासाहेब पाटील, सहसचिव मा.श्री.अविनाश जाधव, सदस्य मा.श्री.साहेबराव जाधव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

शिबिरामध्ये वातविकार, आम्लपित्त, मधुमेह,त्वचाविकार, दंतरोग, श्वसनविकार, पोटाचे विकार, लहान बालकांचे आजार व स्त्रीयांचे विकार-मासिकपाळी समस्या(श्वेतप्रदर,रक्तप्रदर), इत्यादी आजारांच्या रुग्णांवर आवश्यकतेनुसारमोफतऔषधोपचार करण्यात येणार आहे.

शिबिरामध्ये नोंदणी केलेल्या महिलांची कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया मोफ्फत(नि:शुल्क) केली जाईल आणि तसेच प्रसुती(बाळंतपण) व गर्भाशयासंबंधीत विकारांची शस्त्र क्रिया तथा अपेंडिक्स,हर्निया,हायड्रोसिल,मुळव्याध व भगंदर या शस्त्रक्रियाअल्प(५०सवलत)दरात धन्वंतरी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, उदगीर येथे केली जाणार आहे.

शिबिरामध्ये लॉयन्स नेत्र रुग्णालय,उदगीरयांच्यासहकार्याने मोफत नेत्ररोग तपासणी करून मोतीबिंदू आजाराचे निदान झालेल्या व नोंदणी केलेल्या व्यक्तींवर अल्प दरात औषधोपचार व शस्त्रक्रिया सुद्धा करण्यात येणार आहेत.

शिबिरामध्ये आयुर्वेद,अलोपॅथी, डेन्टल,होमिओपॅथी व युनानी या विविध चिकित्सा पद्धतीचे तज्ज्ञ डॉक्टर्स वैद्यकीय सेवेसाठी उपलब्ध राहणार आहेत.

तरी या मोफ्फत शिबिराचा रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहनप्राचार्यडॉ.दत्तात्रयवि.पाटील, डॉ.मंगेश मुंढे,डॉ.उषा काळे,डॉ. रविकांत पाटील,डॉ.अस्मिता भद्रे, डॉ.अमोलपटणे,डॉ.नामदेवबनसोडे, डॉ.अविनाश जाधव,डॉ.रश्मी चिंद्रे, डॉ.स्नेहल पाटील,डॉ.योगेश्वर सुरनर, डॉ.शिवकुमारमरतुळे,डॉ.विष्णुकांत मुंढे,डॉ.ओम चिट्टे आणि तसेच धन्वंतरी आयुर्वेद मेडिकल कॉलेज, उदगीर चे डॉक्टर्स व रुग्णालयीन कर्मचारी यांनी केले आहे.

# श्री हावगीस्वामी महाविद्यालयाचे बारावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

उदगीर: फेब्रुवारी /मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी बोर्ड परीक्षेमध्ये येथील श्री हावगीस्वामी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. महाविद्यालयाच्या विज्ञानशाखेचा निकाल ९८.००% लागला असून या शाखेतून देशपांडे समर्थ नरेंद्र हा विद्यार्थी ७७.३३ % गुण घेऊन विज्ञान शाखेतून प्रथम तर तवंडे ओंकार सतीश ७७.१७% गुण घेऊन व्दितीय तसेच रामजी विश्वांक संतोष हा विद्यार्थी ७७.००% गुण घेऊन तृतीय आला आहे. विज्ञान शाखेतून ०७ विद्यार्थी विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झाले आहेत.

महाविद्यालयातील वाणिज्य शाखेचा निकाल ८८.००% लागला असून या शाखेतून कपाळे हर्ष ईश्वर हा विद्यार्थी ८०.००% गुण घेऊन वाणिज्य शाखेतून सर्वप्रथम आला आहे तर मुंगीलवार श्रुती साईनाथ व वाडकर गायत्री राजकुमार या विद्यार्थिनी ७३.३३% टक्के गुण घेऊन द्वितीय स्थानी व तसेच सूर्यवंशी अर्पण लहू या विद्यार्थ्यांनी ७०.१७% गुण घेऊन तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

कला शाखेतून धोतरे मनीषा बालाजी ही विद्यार्थिनी ७८.७३% गुण घेऊन सर्वप्रथम तर दुवे अक्षय दत्तात्रय ६१.१७% गुण घेऊन द्वितीय तर भोपावड स्वप्नील राम दास या विद्यार्थ्यांनी ६०.००% घेऊन तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. महाविद्यालयातील किमान कौशल्या वर आधारित अभ्यासक्रमा तील विद्यार्थ्यांनीही दरवर्षीप्रमाणे याही वर्षी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाचा एकूण निकाल ९६.१५ % लागला असून या शाखेतून निलंगे गंगोत्री सुभाष या विद्यार्थिनीने ७३.५०% गुण घेऊन अकाउंटिंग व फायनान्शिअल ऑफिस मॅनेजमेंट विभागातून व किमान कौशल्यावर आधारित विभागातून सर्वप्रथम येण्याचा मान मिळवला आहे. तसेच जगताप श्रीहरी प्रकाश हा लॉजिस्टिक व सप्लाय चैन मॅनेजमेंट या विभागातून ७१.००% गुण घेऊन विभागातून प्रथम आला आहे.

बारावी बोर्ड परीक्षेतील यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन भारतलिबरलएज्युकेशनसोसायटीचे अध्यक्ष ॲड.गुणवंतराव पाटील हैबतपूरकर, उपाध्यक्ष शिवकुमार हसरगुंडे, संगमेश्वर जिरगे, संस्थेचे सचिव उमेश पाटील देवणीकर, सहसचिव प्रभुराज कप्पीकेरे, कोषाध्यक्ष शंकरप्पा हरकरे, संस्थेचे सर्व सन्माननीय सदस्य, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ एन.जी.एमेकर, उपप्राचार्य डॉ अप्पाराव काळगापुरे, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. माधव भंडारे, एचएसव्हीसी चे पर्यवेक्षक प्रा.अनिल बिरादार, ग्रंथपाल प्रा.अजित रंगदळ, कार्यालयीन अधीक्षक सूर्यकांत धनुरे, तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचऱ्यांनी यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले.

०००००

# श्यामार्य कन्या जूनिअर कॉलेज चा निकाल १००%



उदगीर : तालुक्यातील एकमेव मुलींसाठी चालणारे ङ्गश्यामलाल स्मारक शिक्षण संस्था संचलित श्यामार्य कन्या ज्युनिअर कॉलेज उदगीर येथील आर्ट्स व कॉमर्स विभागामधून परीक्षा दिलेल्या सर्वच्या सर्व विद्यार्थी विशेष गुणांसह उत्तीर्ण होत *प्रती वर्षाप्रमाणे या ही वर्षी उदगीर तालुक्यातून १००% निकाल देणारे एकमेव ज्युनिअर कॉलेज ठरले आहे. या विद्यार्थिनी विशेष प्रावीण्यासह घवघवीत यश संपादन केल्या आहेत. तर प्रति वर्षाप्रमाणे या वर्षी ही १००% यशाची परंपरा कायम ठेवत संस्थेने आपले यश अबाधित ठेवले आहे तथा संस्थेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादित करत संस्थेचे शैक्षणिक क्षेत्रात नावलोकिक निर्माण केले, मुलींना आत्मनिर्भरता,कला,क्रीडा, व्यक्तिमत्त्वविकास तथा संस्काराच्या शिक्षणा सोबतच, या निकालातून गुणात्मक परंपरा तिकऊन ठेवली आहे.या यशाबद्दल संस्था अध्यक्ष सुपोष पाणी आर्य,सचिव ॲड. विक्रम संकाये, सहसचिव अंजुमनिताई आर्य,संस्था मुख्याध्यापिका श्रीमती टि.एस.पंडित यांनी विद्यार्थ्यांचे तथा संबंधित शिक्षक वृंद यांचे अभिनंदन केले आहे. तर या घवघवीत निकालासाठी प्रयत्न करून आपली १००% यशाची परंपरा कायम राखण्यासाठी प्रा.संगीता देशमुख , प्रा.महेश हुलसुरे, प्रा.शिवरूद्र पाटील, प्रा.मदन नेत्रगावे, प्रा.सुभाष सोनकांबळे, प्रा.शिर्षे यांनी मेहनत घेतली...

**कला विभागातून:-**

अपसिंगेकर आसावरी प्रविण ८४.३३%

शेख निशाद शहाबुद्दीन ८३.१७

सोनवणे कोमल बब्रूवान ८२%

शास्त्री भार्गवी संजय ७८%

**वाणिज्य विभागातून:-**

पाटील अश्विनी अशोक ८७.%

पाटील श्रुती पद्माकर ८१.८३%

दाजी शिवानी नागनाथ ८०%

# समर्थ कनिष्ठ महाविद्यालयाचा शेकडा निकाल ९९.३५ टक्के



उदगीर : तालुक्यातील एकुर्का रोड येथील समर्थ कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मार्च २०२४ च्या बारावी बोर्ड परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले असून महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा एकूण निकाल ९९.३५ टक्के, कला शाखेचा एकूण निकाल ९५.४१ टक्के तर एचएसव्हीसी शाखेचा एकूण निकाल ९३.४७ टक्के लागला आहे.

विज्ञान शाखेतून सोनम शिवकुमार तोंडारे हिने ९०.१७ टक्के गुण घेऊन प्रथम येण्याचा मान मिळविला आहे.

सौंदर्या संतोष अंबेसंगे व सुशील संतोष कोरे या विद्यार्थ्यांनी ८९.३३ टक्के गुण घेऊन व्दितीय आले आहेत. तर शितल उत्तम जाधव व मंथन गोपाळ चव्हाण हे ८८.१७ टक्के गुण घेत तृतीय आले आहेत. कला शाखेतून गणेश सुरेश आळंदीकर ८४.१७ टक्के गुण घेऊन प्रथम आला आहे. ओम रमेश कुंडगीर व अम्रपाली प्रेमनाथ सोनकांबळे ८२.८३ टक्के गुण घेऊन व्दितीय आले आहेत. तर रिहाना कबीर पठाण ८२. १७ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. एचएसव्हीसी शाखेतून प्रतिक्षा धनराज सुतार ८५.५० टक्के गुण घेऊन प्रथम आली आहे. अरफ्फ़ान शेख करिम शेख ८१.१७ टक्के गुण घेऊन व्दितीय आला आहे. तर अगलावे यशोदा व्यंकट हि ८०.५० टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. विज्ञान शाखेत एकूण १५५ विद्यार्थी परिक्षेस बसले होते. पैकी १३९ विद्यार्थी विशेष प्राविण्यात उत्तीर्ण झाले आहेत. प्रथम श्रेणीत १४ द्वितीय श्रेणीत एक उत्तीर्ण झाला आहे. कला व एचएसव्हीसी शाखेतून १०९ विद्यार्थी परिक्षेस बसले होते. पैकी ३४ विद्यार्थी विशेष प्राविण्यात, ६७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, तीन विद्यार्थी द्वितीय श्रेणीत, तर १०४ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत आहेत. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थासचिव प्राचार्य प्रमोद चौधरी, पर्यवेक्षक सिद्धार्थ बोडके, संस्था सदस्य प्रा. एम. व्ही. स्वामी, जेष्ठ प्रा. बी. एस. बाबळसुरे, रसूल पठाण याच्यांसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.